साहामाही ॥ ३ ॥ ०८
साल अखेर १ ७ ॥ १ ०१८
कैरकोळ अंकास ........................०४

नोटिशी बद्दल.
१॰ ओळीचे आंत रु. १
ओळीस ०१०६
पेपेस..........

Per annum in arrears 7 „ 1R. 9 as
Six monthly ........... 3 „ 8 as.
Single copy ........................... 4 as.

Advertisements.
Below 10 lines...
RPer line over 10...4a.
a petition per line...8a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL.XXII AKOLA MONDAY 5 MARCH 1888. NO. 9

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख ५ माहे मार्च सन १८८८ इ० अंक ९

NOTICE.

To,

The President of the Municipality

Akola.

The undersigned has a garden near Kala Hânuman at Akola on the riverside.

The undersigned understands that about the middle of december last, the Municipal servants took forcible possession of this gaaden by the order of the Vice President.

The undersigned, therefor, here-e by gives notice th t if the Municipality does not give back possession of the garden and make proper compensation to him tor the loss occasioned by the occupation of the land by the Municipality, within the period of one month from receipt of this notice, he shall institute a suit against the Municipality in a Court of law.

Amraoti 24th February 1888. — Abaji Bauji Panhalker Mukhtiar Ramchandra Abaji Panhalker Amraoti.

---

पंजाव नादारी मुकदमा नंबर २ सन १८८८

नमुना [ जी ].

विद्यमान नादारी कोर्टाचे जड्ज्य जिल्हा अकोला

सर्वत्रांस कळविण्यासाठीं प्रसिद्ध केलें जातें कीं सेख इस्माल वल्लद हसनमहमद हा नादार आहे असा आज तारीख २७ माहे जानेवारी सन १८८८ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख १७ माहे मार्च सन १८८८ हा दिवस नादाराच्या सावकारांनीं नमण्याकरितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फे असामी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं याबद्दल आठ आण्यांचे स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल, आणि त्याबद्दल साक्षी समन्स करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें दाखल करावीं. ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवसांपूर्वीं तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं नोंदण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड रीतीनें ठेविल्या आहेत. ज्या नांवावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं ०८ आण्यांचे स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असले बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहुन त्यावर अर्जदारानें सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे रहाणार असतील त्यांनीं आठ आण्यांचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिश्टरी दाखल होतील. कळावें तारीख २१ माहे जानेवारी सन १८८८ इ०

Damodar Nanaji

नादारी कोर्टाचे क्लार्क जिल्हे अकोला.

---

## जाहिरात

टपाल खर्च ०४ आणे

### वनौषधी सार्सा प्रमाणें.

किंमत एक बाटलीस १॥ रुपया

औषधी सोबत कागद व चमचा.

फक्त एकाच औषधीपासून खाली लिहिलेले सर्व प्रकारचे रोग दूर होतात, व त्या संबंधानें झालेला पत्रव्यवहार व सर्टिफिकिटें स्थलसंकोचास्तव न देतां रोगांचीं नांवें मात्र दिलीं आहेत. उपदंशजन्य, गरमीचे अनेक प्रकारचे रोग, धातु, खर स्त्रियांस धुपणी लागते ती रक्त दुषीत झाल्यापासून हातां पायांवर डाग पडणें, सर्व त्वचेचे रोग कच्चा पारा सेवन केल्यानें सूज येणें, कळा लागणें व सर्व प्रकारचा संधी वायु, गंडमाळा, पिनस, जळवात, कडकी अम्लपित्त, पोटशूळ, पोटफुगी, नळवायु, मस्तकशूळ व मुखरोग जिभेवरील चट्टे, दातांतून पू येणें, रक्त येणें व तोंडाची दुर्गंधी आदिकरून सर्व रोग वरील औषधानें दूर होतात.

पत्ता—मुंबई फणसवाडींत बाळकृष्ण भिवाजी नाखवा यांचे चाळींत डा. धाकजी भानजी सांवत.

Dr. D. B. sawaut.
30-12-1887

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

ता० १९।२।८८

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

साष्टांग नमस्कार वि० वि० हिंदुस्थानचें राज्य इंग्रजांनीं घेतल्यावर त्याची व्यवस्था त्यांनीं लाविली. प्रांत, जिल्हे, तालुके, परगणे ही व्यवस्था लॉर्ड कॉर्नवॉलिस साहेब गव्हरनरजनरल यांनीं केली तेव्हां पासून ही व्यवस्था चालू आहे. आतां ह्या व्यवस्थे बरहुकुम अधिकारी कोण व त्यांचा अंमल कसा चालतो हें पहातां असें दिसतें कीं पुर्वीं ह्मणजे १८५७ सालापूर्वीं हिंदुस्थानचें राज्य "पूर्वेकडील राज्य चालविणारी कंपनी हिचे व्यवस्थापक यांचे मार्फत चालत असे. परंतु तेव्हां रयतेवर जुलुम होत असत जसें उत्तर हिंदुस्थानांत वॉर्नहेस्टिंग्ज साहेबांनीं केले. व कंपनीच्या अमलांत जुलमाचा कळस होत होत अखेर १८५७ सालच्या अविचारी शिपायांच्या बंडापर्यंत येऊन मजल ठेपली. तेव्हां ह्या गोष्टीमुळें राजा व प्रजा ह्या उभयतांना अनेक प्रकारें नुकसान सोसावें लागलें व पुढें असे प्रकार होऊं नयेत ह्मणून आमची परम दयाळू राणी चक्रवर्तीनी व्हिक्टोरिया यांनीं सर्व अधिकार त्या कंपनीकडून काढून आपल्या हातांत घेतला. व प्रजेच्या कल्याणार्थ एकसारखी खटपट चालू आहे. ह्यांच्या कारकिर्दींत विद्या व्यापार व नानाप्रकारच्या लोक हितांच्या गोष्टींची अभिवृद्धि होत चालली आहे. ह्यांच्या अमलांत राज्य चालविण्याचीं तत्वें खरीं व जे जे कायदे ह्मणून करितात ते लोक हिताचे परंतु राजसूत्रें चालविणारांच्या एकाद्या विशेष गुणामुळें एकादे वेळेस उड्डाण नियमाच्या पलीकडे जाऊन रयतेचें नुकसान होऊन दुःखें सोसावीं लागतात हें केवळ रयतेचें दुर्दैव ह्या शिवाय दुसरें कांहीं म्हणतां येत नाहीं.

वर जे ह्या भव्य व विस्तीर्ण हिंदुस्थानच्या राष्ट्राचे राज्यकारभारासाठीं पाडलेले विभाग दर्शित केले आहेत त्यांवर अंमल कोणाचा याचा विचार करणें आहे. हिंदुस्थानचा राज्यकारभार पहाण्यासाठीं इंग्लंडमध्यें एक मोठा कामगार असतो त्यास सेक्रेटरी फॉर इंडिया असें म्हणतात. राणी सरकाराकडून हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविण्यासाठीं गव्हरनरजनरलची नेमणूक होत असते. गव्हरनरजनरलचे ताब्यांत इलाखाधीपति व प्रांताधीपति असतात. प्रांताधीपतीच्या ताब्यांत जिल्हाधीपती, जिल्हाधीपतीच्या ताब्यांत तालुकाधीपती तालुकाधीपतीच्या ताब्यांत ग्रामाधीपती वगैरे असतात. मोठ्यापासून तों अगदीं लहानापर्यंत कामगारांचा परस्पर संबंध व त्यांचा अधिकार वर दर्शित केल्याप्रमाणें चालत असतो. अलीकडे सरकारानें मोठे गांवीं लोकल कमेट्या नेमिल्या आहेत व सामान्य शहरामध्यें म्युनिसिपल कमेट्या नेमिल्या आहेत. ह्यांचीं कामें मुख्यत्वेंकरून म्हटलें म्हणजे गांव व शहर सफाई राखणें व लोकांची आरोग्यता जेणें करून राहील ते उपाय योजणें हें होय. व जे कामगार वर ध्वनित केले त्यांनीं आपापल्या नियमित अधिकाराप्रमाणें कामें चालविलीं पाहिजेत. आतां स्टेट सेक्रेटरी व गव्हरनरजनरल यांचा अधिकार जरी अगदीं मोठ्यापासून तों ग्रामाधीपती पर्यंत चालण्याजोगा आहे तरी ज्या रीती कायद्यानें लावून दिल्या आहेत त्या त्यांस उल्लंघन करितां येत नाहींत व त्याप्रमाणें चालल्यानें त्यांचा बोजा व लोकांची त्यांचे वरची भक्ति कमी होण्याचा विशेष संभव आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक कामगारानें ज्या ज्या कामगाराच्या मार्फतच तें करून घेतला पाहिजे. ही खरी व्यवस्थेशीर रीत होय अगदीं लहान गांवी म्हटला म्हणजे तेथें पाटील व त्याचा मदतनवीस पांड्या हेच काय ते सरकारी कामगार होत. गांवांत सफाई नसली व ती पहाण्याचें ज्याचें काम आहे त्यांच्या दृष्टीस ती पडली तर त्याबद्दल पाटील पांड्यांना अगर लोकल कमेटी किंवा म्युनिसिपल कमेटी ज्यांचा अधिकार त्या त्या गांवीं अगर शहरीं चालत असेल त्यांस त्याबद्दल कामगारानें त्याबद्दल जी काय शिक्षा देणें ती दिली असतां यापासून असें होईल कीं गांवांतील अधिकारी आपलें काम चांगलें करण्यास झटतील. व लोक जे त्यांच्या ताब्यांत असतील ते त्यांचा अधिकार मानितील. जसा जसा ज्याचा अधिकार असेल तसें तसें त्यानें चाललें पाहिजे. व ह्या जिल्ह्यांत कोठें कोठें असें ऐकण्यांत येतें कीं, मोठा अधिकारी ह्या दरम्यानच्या अधिकाऱ्या मार्फत जीं कामें घ्यावयाचीं तीं आपण स्वताच्या हातांत. या मुळें होतें काय कीं इतर कामगारांचा बोज जसा राहावा तसा राखत नाहीं व अर्थात गांवकरी ग्रामाधिकाऱ्यांचें ऐकत नाहींत. तेणें करून गांवांत स्वच्छता कमी रहाते व मोठे अधिकारी फिरावयास आले कीं त्यांच्या दृष्टीस शहर अगर ग्रामसफाई जशी यावी तशी येत नाहीं व लोकांना शिक्षा कधीं कधीं २९०।२९१ व कधीं कधीं १८८ इं. पि. कोडप्रमाणें भोगाव्या लागतात. व गांवकरी अधिकारी यांचाही असें झाल्यानें पाणउतारा होतो. गांवसफाई जेव्हां जेव्हां नाहीं असें अधिकाऱ्यांचे पहाण्यांत येतें तेव्हां त्याबद्दल गांवचे अधिकारी यांस व लोकल कमेटी अगर म्युनिसिपालिटीचे अधिकारी यांस त्याबद्दल काय जें शासन करावयाचें तें झालें पाहिजे. असें झाल्यानें हे ग्रामाधीकारी सफाईचें काम आस्तेपूर्वक करितील व लोकही त्यांचें मानितील. हल्लीं काय झालें आहे सर्व कांहीं मुख्याधिकारी पहातात तेव्हां ग्रामाधीकाऱ्याचें काय म्हणून मानावें असा लोकांच्या मनाचा कल झाला आहे. सदर्हु कामांच्या तडाक्यांत लोक फार त्रस्त होऊन गेले आहेत अशी लोकांची वार्ता आहे. मनुष्यानें मोठाच अपराध केला असला तर त्याला शासन होणें व त्यानें तें मुकाट्यानें सोसणें रास्त आहे. परंतु लहानसहान अपराधाबद्दल कडक म्हणजे कारागृहाचा शिक्षा भोगावयाची काळी येणें हें केवळ दुर्दैवच समजलें पाहिजे. असो. हे विनंती.

आपला
एक "क्ष."

---

## मि. पाध्ये यांचे व्याख्यान व समाजसुधारणा.

( लिहून आलेला मजकूर )

परवाच्या व्यादर्शगमध्यें मि. पाध्ये यांचें जें व्याख्यान झालें त्यांत त्यांचें तरतरीत विद्वत्तेशी विचार गांभीर्याचें साम्य पाहून कोणास आश्चर्यानंद झाल्यावांचून राहावणार नाहीं. आह्मांस सध्या अशाच सुधारकांची अवश्यकता आहे.

आमच्या लोकांस समाज सुधारणा हा एक मोठा गूढ— जरीशीळा — व गमतीचा विषय होऊन राहिला आहे. कारण प्रत्येकाला सुधारणा पाहिजे आहे परंतु बहुतकांची मतें एकमेकापासून भिन्न आहेत; त्या योगानें एकंदर समाजास फारच चमत्कारीक व घातक स्थिती प्राप्त झाली आहे. उदाहणार्थ-आह्मांस आमची जुनी धर्मरीत आवडत नाहीं, नवीन प्रार्थना समाज रीत आवडत नाहीं, ख्रीश्चन अथवा दुसरी कोणतीही धर्मरीत आवडत नाहीं.

त्याचप्रमाणे आमच्यांत समाज सुधारक तीन प्रकारचे एकास सुधारणा एकदम झाली पाहिजे असे वाटतें दुसऱ्यास ती चोहोकडून व सावकास झाली पाहिजे असें वाटतें आणि तिसऱ्यास ती मुळींच नको, तो 'पिछेसे आया' ह्यातच सुख मानतो. अशा रीतीचा आमच्या समाजांत गोंधळ होऊन त्यामध्यें चंचलता व अस्थास्थत्व प्राप्त झालें आहे; व त्यापासून कशावरही पूज्य बुद्धि रहात नाहीं. आमचा समाज सुधारण्याला कोणता तरी एक सरळ मार्ग पाहिजे आहे, व तो मार्ग दाखविण्यास आह्मांस कोणी तरी सर्व मान्य, दृढनिश्चयी सहनशील, विचारी व श्रांतश्रमकरणारे ( इश्वरी अवतार का ह्मणाना! ) लोक पाहिजे आहेत त्यांखेरीज कोणी कितीही जरी कोशीष केला तरी कांहीं उपयोग नाहीं.

कोणतीही गोष्ट करण्याविषयीं आह्मी लोकांस सांगतो व आमच्यावर प्रसंग आला असतां आह्मी आंग काढून घेतो व 'ते सव उपदेशापुरतें' अथवा 'पुराणांतील वांगी पुरांत' असा शास्त्रार्थ सांगण्यास तयार होतो, ही स्थिती जोपावेतो आमच्या सुधारकांत आहे तोपावेतो आमची सुधारणा होणें स्वर्गीसुद्धां आणणें व्यर्थ होय. 'बोले तैसा चाले' जोपर्यंत आमचें ब्रीद होऊन रहात नाहीं तोपर्यंत आमची सुधारणा होणें अशक्य आहे. मदिरामृताचा पेला घेऊन उंचण्यास उमेराहून डोळे मिटून गांभीर्यानें लोकांस दारूपासून तोटे होतात असा उपदेश केला व एकीकडे तो पेला श्री मुखांत गट्ट केला तर त्यापासून लोकांच्या मनांत कितीसा पूज्यभाव उत्पन्न होणार आहे? करितां आमच्या सुधारकांनीं अजून तरी सावध व्हावे. आमच्या जुन्या सुधारकांपासून ह्मणजे दुर्धारकापासून आमची सुधारणा होणें अशक्यच आहे, करितां आमच्या सुधारकांनीं समाजाचे कल्याण करणें हें उक्त होय.

नवीन सुधारकांचें पहिलें कर्तव्यकर्म हेंच आहे कीं, त्यांनीं वृद्ध सुधारकांच्या शिरावरील भार आपल्या शिरांवर घ्यावा व त्यांस विश्रांती द्यावी व दुर्धारकांनींही आपल्या मलीन झालेल्या मेंदूस व्यर्थ देऊं नयेत.

---

वऱ्हाडसमाचार.

मिती फाल्गुन वद्य ८ शके १८०९

---

आमच्या ता० २० फेब्रुवारीच्या व आ अंकांत येथील म्युनि०च्या प्रेसिडेंटास व व्हाईस प्रेसिडेंटास लोकांनीं नोटीसा दिल्या आहेत. लोक इतके नाखुश होऊन अशा नोटिसा देण्यास तयार झाले व त्यांनीं त्या प्रत्यक्ष दिल्या. ह्या वरून म्युनि.टीकडून त्यांच्या संबधानें कांहीं तरी गैरशिस्तपणा झाला असावा. लोक न्यायाचे संबधांत किंवा कायद्याविषयीं इतके अडाणी नाहीत. निदान जर ते स्वतः पुरेसे शहाणे नसतील तर त्यांनीं हा नोटिसा देण्याचा मार्ग जाणत्या लोकांस विचारपूस केल्या शिवाय स्वीकारला नसावा. ह्या लोकांच्या ज्या तक्रारी आहेत त्या संबधानें काहींच विश्वासनीय माहितो नसल्यामुळें आह्मास ह्या संबधांत कांहींच माहितीं येत नाहीं. तथापि चाललेला प्रकार म्युनि. स भूषणास्पद नसून निंद्य आहे. कमिटीनें आपल्या कामांत खरोखरच कांहीं अन्याय केलें असल्यास वरिष्ट अधिकारी त्यांत मन घालून नेट चौकशी करितील अशी आमची पूर्ण आशा आहे.

---

हिंदुस्थानचा पोष्टखात्याचा सन १८८६।८७ सालचा रिपोर्ट मागील सरकारी ग्याझेटांत छापून प्रसिद्ध झाला आहे. मागील सालांत ह्या खात्याचें एकंदर उत्पन्न १,१९,७८,७८० रुपये झालें व खर्च १,३९,७८,६३० रुपये झाला. रेव्हेन्यु मनिआर्डर पद्धती वायव्येकडील प्रांतांत सुरू झाली व ती जपासून लोक बराच उपयोग करून घेऊं लागले व पोस्ट खात्यासही बरेंच उत्पन्न झालें. मनिआर्डरचे पैसे ज्याचे त्यास आपापले घरीं पावते करण्याची रीत जी सुरू केली आहे ती सर्व लोकांस फार सोईची आहे व मान्य आहे. ही रीत जर्मनींतील पोष्ट खात्यांत आहे व तिचेच हिंदुस्थानांतील पोष्ट खातें अनुकरण करीत आहे. ही रीत दुसरें कोठेंही नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. गेले वर्षांत एकंदर १०,६८,४९,१३१ रुपयाच्या मनीआर्डरी झाल्या व त्यांवर पोष्ट खात्यास १३,१७,८२० रुपये कमिशन मिळालें. टेलिग्राफीक मनिआर्डरचें काम ह्मणण्यासारखें सुरळीत चालत नाहीं. पोष्टल सेव्हिंग ब्यांकेचें काम बरें चाललें आहे. गेले वर्षीचे अखेरीस एकंदर ४,२९,१२,३४४ रु १५०९ ब्यांकेंत शिलक होते. कायद्यानें ज्याबद्दल शिक्षा होते असे अपराध पोस्ट खात्याचे नोकरांकडून १५० घडले. पोस्टाच्या ज्या नोकरांचा पैशाशीं प्रत्यक्ष संबंध असतो त्यांजकडून जामीन घेण्याची किंवा रोख पैसा ठेवविण्याची रीत काढिली असतां त्यांजकडून पैशासंबधीं गुन्हे होण्याचा कमी संभव आहे

---

कंपन्यांचीं दुकानें येथें बरींच झालीं आहेत. पण तीं, सारीं सुरळीत चालावीं ह्मणून त्यां त्या कंपनीचे पुढारी मंडळीनें खबरदारी ठेविली पाहिजे. आह्मांस असें समजतें कीं कित्येक कंपन्यांचे भागीदारांनीं आपली भागीदारी काढून घेण्याचे संबधानें किंवा दुकान मोडून टाकण्याचे संबधानें दुकानास नोटिसा देण्यास आरंभ केला. दुकान काढणें जितकें स्तुत्य तितकेंच तें मोडण्याचा यत्न करणें निंद्य होय. पूर्वीं वऱ्हाड ट्रेडिंग कंपनीचे कित्येक भागीदारांनीं अशीच गडबड केली होती. त्या वेळचा आमचा बराच खरपूस असा लेख बऱ्याच लोकांस स्मरत नाहीं. पण तशा लेखाची आतां जरूर लागणार नाहीं अशी आमची उमेद आहे.

---

सरकारी नौकरांनीं जामिनी घेणें व व्यापाराचे कामांत आपलें आंग ठेवणें ह्या संबंधानें हिंदुस्थान सरकारचा ठराव व त्या सोबत रेसिडेंट साहेबांचे १८८७ चे सरक्युलर नंबर २० हीं फार महत्वाची आहेत म्हणून ती येथें छापून प्रसिद्ध केली आहेत.

बुक सरक्युलर नंबर २० सन १८८७

हैद्राबाद येथील रेसिडेंट यांचे वऱ्हाडसंबंधीं सेक्रेटरी यांजकडून, कामेशनर, ज्युडिशियल कामिशनर, सर्व डिपोटी कामिशनर व हैद्राबाद मुलुक अमानी येथील सर्व खात्यांचे वरिष्ट अमलदार यांस

मुक्काम हैद्राबाद रेसिडेन्सी तारीख २० सप्टेंमबर सन १८८७

हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी, होम खातें यांचें हैदराबादचे रेसिडेंट यांस आलेलें पत्र नंबर २१-८०६ तारीख १३ मे सन १८८५ चे याची या सोबत जोडलेली नकल आपल्या नजरेस आणून आपल्यास अशी विनंती करण्यांत येत आहे कीं त्याच्या नकला या सरक्युलरांतील बाकी आपल्या हातो खालच्या ज्या नौकरांस लागू होत असतील त्यांस बाटण्यांत याव्या.

यांचें मराठी भाषांतर हैदराबाद मुलुक अमानी येथील कमिशनर यांचे कचेरींत अर्ज केला असतां मिळेल.

२ हिंदुस्थान सरकारचे पत्र जे हल्लीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे त्यांचे कलम ५ या अन्वये ज्या सर्व जमिनी सरकारी नोकरांच्या ताब्यांत असतील त्यांचे एक रजिस्टर ठवणें जरूर आहे व हे हुकम ज्या सरकारी नोकरांस दरमहा २० रुपयाहून कमी पगार नसेल त्या सर्वांस लागू आहेत.

३ या सरक्युलरास जोडलेलें परिशिष्ट अ यांत दिलेल्या नमुन्या बरहुकूम एक रजिस्टर हैदराबाद मुलुक अमानी येथील कमिशनर यांच्या कचेरींत सर्व तहशिलदार, नायब तहसिलदार, व कामिशनर साहेब यांचे कचेरींतील कामगारां करितां ठेविलें जाईल. व प्रत्येक डिपोटी कामिशनर यांचे कचेरींत त्या कचेरींतील कामगार ज्यांचा कायमचा पगार दरमहा २० रुपयांहून कमी नसेल व जे पोलीस रजिस्ट्रेशन आणि स्टांप फारेस्ट व शाळा खातें अशा स्पेशल खात्यांत नोकर नसतील व त्यांचें एक रजिस्टर ठेविलें जाईल. यांत इंग्रजी हापिसांतील क्लार्क यांचा समावेश करूं नये.

४ प्रत्येक खात्यांतील वरीष्ट अमलदार यानें याच नमुन्या बरहुकूम एक रजिस्टर ठेववें व त्यांत आपल्या खात्यांतील प्रत्येक कामगार ( हापिसांतील क्लार्क शिवाय करून ) ज्यांचा कायमचा पगार दरमहा २० रुपयांहून कमी नसेल त्या संबधीं जरूर असलेली सर्व माहिती द्यावी.

५. हैदराबाद मुलुक अमानी येथील कमिशनर सा. यांचे कचेरींत कमिशन मधील सर्व कामगारांचे ( असिस्टंट व एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर धरून ) रजिस्टर ठेविलें जाईल.

६. रजिस्टर अ. याची नकल सब डिपोटी कमिशनर व खात्यांचे मुख्य अधिकारी यांहीं कमिशनर साहेब यांचे कचेरींत दरसाल दाखल होण्याकरितां रवाना करावी. व त्यानंतर प्रत्येक वर्षीं जानेवारी महिन्याचे १ ले तारखेस मागील वर्षांत झालेल्या जादा [illegible] एक रिटर्न ( रजिस्टर अ. च्या नमुन्या प्रमाणेंच ) कमिशनर साहेबांकडे पाठवावें.

७. ज्या प्रत्येक कामगारास वर सांगितलेले नियम लागू असतील त्यास या सोबत प्रसिद्ध केलेल्या हिंदुस्थान सरकारच्या पत्राची एक नकल द्यावी. व ज्या कचेरींत त्याची जमीन ( त्याच्या ताब्यांत कांहीं असल्यास ) नोंदण्याची असेल त्या कचेरींतील मुख्य अधिकारी यानें त्यास सरकारच्या पत्राचें कलम ५ यांत सांगितलेल्या प्रमाणें प्रतीज्ञा लेख लिहिण्यास सांगावें. सदरील इसमाची अशा प्रकारची जमीन नसेल तर त्याणें त्या प्रमाणें प्रतिज्ञा करावी.

८. वेळ व श्रम वांचविण्यास या सोबत जोडलेल्या नमुन्याचा ( परिशिष्ट ब. ) उपयोग प्रातिज्ञा लेख घेण्यास करावा.

९. सरकारी खात्यांत दरमहा २० किंवा त्याहून जास्त रुपये पगाराच जागेकरितां जे उमेदवार असतील त्या सर्वांना परिशिष्ट ब. यांत दिलेल्या नमुन्याप्रमाणें प्रतिज्ञा लेख दिला पाहिजे.

१०. या सरक्युलर १५ सन १८८९ चें रद्द झालें आहे.

आपला

डोनाल्ड राबर्टसन, मेजर.

फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट व वऱ्हाड संबंधी सेक्रेटरी.

---

# The Berar Samachar

MONDAY MARCH 5, 1888

The appointment of Sir Charles Turner to the vacant seat in the Indina legislative council will meet with general satisfaction. The memory of his services in connection with the Civil Service commission is still fresh. The opportunities which it afforded him to learn the opinions of the natives of this country, the attention and zeal with which he has studied the Indian problems, and the calmness and perseverence which he showed in making himself thoroughly acquainted with their grievances and demands, have considerably widened his experience of India and have made him more fit to occupy the honourable post for which he is now selected. When we take into consideration the views expressed by him at Madras, we rather feel misgivings as to whether he would always sympathise with and be a staunch supporter of the cause of the natives hereof. But we sincerely hope that Sir Charles Turner will have no room for our misgivings, and by zealously cooperating with the honourable member Mr. Peile, who is in touch with the native aspirations and demands, will try to gain the confidence and good opinion, and amply fulfil our expectations.

---

We are much pleased to see the vigorous progress that is now being effected at Indore during the administration of the Dewan, Raghunathrao. Since he has accepted ministership he has been trying to improve the material as well as social condition of the peop of the state. We now learn that a social organization is now formed. There to carry out into practice reforms such

as the introduction of the widow remarriage, the prevention of early marriages abolitions of certain preposterous and worst customs that are now generally talked of everywhere. The attempts of the Dewan are creditable; but we hope that in the zeal of pushing forth reforms on the people, who are yet in the dark and hence opposed to them, the Dewan would try to keep pace with them. If he tries to go a head of them, and in any way injures their feelings, he will certainly receive a strong opposition from the old and orthodox section of the community, and failure would be the inevitable consequence in the teeth of opposition. Perhaps the mischief would not end here, but would go further in impeding the progress of civilization, and creating a barrier between the people of new and old type. The great fact to be borne in mind is that in introducing reforms the aid of the orthodox people is indispensable. They are the pillars of all social organizations and if they are not formerly secured the building raised on them would totter and tumble down. Some time ago in these columns we showed clearly how public opinion must be first created before we undertake any reform and how their minds should be roused from inactivity and a spirit of inquiry set in scepticism must make considerable progress in the nature before any steps can be taken in the introduction of new changes in the existing state of affairs. We would wish that similar institutions be established in all parts of this country and a similar movement be made in undertaking the most practical reforms. Though the widow remarriage is now repugnant to the feelings of the majority of the people, still in course of time they would be accostomed to it if things move on in the same course, and the subject is often and often discussed. But in the meantime they would not be unwilling to take steps to prevent early marriages, to reduce the lavish expenditure in marriages, to assign a maximum limit to dowries, to dispense with some of the formalities, which d[illegible]y perplex them, and so on. How desirable it would be if the educated people, who may be considered as the leaders of our society, [illegible] take the lead in setting an example to those that look up to them for imitation.

There are men in [illegible] world who would always try to make themselves notorious. Of this character is Sir Syed. He has attracted the notice of the Anglo Indian papers, which are always on the alert to notice the weak points of the natives and sowing dissu[illegible] among them, by personal attacks. The Times has refrained from any criticisms on the speeches of Sir Syed. But it has indirectly cast reproaches on the Bengalies. If Sir Syed had represented the whole Mahomedan community and had been their mouth piece, as he wants to make people believe then his arguments would have had some weight. But strange to say that he is contradicted in his statements by brothren of his own community, who openly declare that the body of Mahomedans, whose mouth piece is Sir Syed, is a very small minority. The statements that he has made upto this time are contradicted by facts wellknown to all. His arguments are the flimsiest of all and only betray his ignorance. They are possibly prompted by the jealousy which he feels against other communities who have made progress in civilization and gone far ahead of them. Howsoever he may indulge in these ungenerous attacks he must bear in mind the important fact that the English Government cannot be imposed and prevailed upon to show partiality to Mahamedans at the sacrifice of others, by such worthless complaints as throw discredit on those who raise them. Can it be even for a moment supposed that the English Government, the sole aim of which is to educate the people of India, to initiate them into the principles of Government, to teach them what true liberty is made of and the mutual duties of subjects and Governments, would dub the subjects as disloyal and sedition-mongers when they come forward to demand what is warranted by the first principles of liberty, and represent boldly their grievances? It would be against their sense of natural justice and repugnant to their ideas of freedom. We feel that Sir Syed will do good to himself and his party by following the example of his coreligionists in Sind who have been trying their utmost to raise the intellectual states of the mahomedan community and then to compete with Bengalees and Hindoos.

---

The first gathering of the Exstudents of Berar High Schools came off at Akola on the 26th and 27th of the last month. It was as perfect a success as could possibly be desired under the circumstances attending the infant institution. About 150 Ex-students had assembled from all parts of the province. In the morning of the 26th they all met in the Mandwa erected in the compound of the club. Mr. Krishnaji Malhar Paithanker one of the secretaries of the gathering gave a short opening speech explaining therein the object of the gathering and the several advantages derivable from it. Then Mr. Gunesh Shrikrishna Khaperde was unanimously called to the chair amidst loud cheer. He gave a short speech assuring all who had met that there were signs to show that the gathering will be a prosperous institution. The meeting then dissolved. After dinner, the members met in the Mandwa where asinging party had been arranged for for their entertainment. The educated and influential men in the town were invited to attend this meeting. Professor Chatre, Messers Shriram Bhikaji Jatar, Deorao Vinayak, Pandurang Govind, Krishnaji Hari and others accordingly graced the occasion with their presence. At about 4 P. M. when the entertainment was over Mr. Gopal Waman Bapat read an excellent essay on "the educated man and his responsibilities." The assembly then broke up. At night all the members went together to witness the Chatre's circus. Next day early in the morning they all went to the Jubilee park and played there some native games till about 8 A. M. Afterwards they had a tea party. After dinner they all again met at about 2 P. M. in the Mandwa and other gentlemen in the town were also, as on the previous day, present. About two hours were passed in the entertainment alike the day preceding. Then at about 4 P. M. Mr. Damodhar Ganesh Padhye M. A. gave an excellent lecture on Sociology. The subject being new it was listened to with great interest. Then at the reuqest of the President of the gathering Mr. Shriram Bhikaji Jatar rose and gave a short speech. He said it gave him great pleasure to see all the young gentlemen whose education began in Berar High Schools assembled here and that he fully sympathizes with the gathering in the object they have in view and the means they have adopted. He also s[illegible]t had Dr. Sinclair been living [illegible] have been very much ple[illegible] this gathering as one of the proofs of the success which his labour for introducing proper educational system in Berar has attained. He also said that this gathering would in the course of a few years be a Sarvajanik Sabha of Berar. He sat down amidst loud cheers. Then an essay full of information on self-improvement prepared by Mr. Balkrishna Govind Sule and another excellent essay written by Mr. Sadasheo rao Bhagwant were read. After this with the President's fitting speech the proceedings of the gathering came to a close.

Professor Chatre being a good natured gentleman took advantage of this gathering to become acquainted with many educated men in Berar. He liberally gave a donation of Rs. 25 to the gathering. The members of the gathering also presented to him a Shal, pagree and a whip as a token friendship and high respect for his perseverence and patriotism.

---

The Cama Barister's Victoria Jubilee scholarship of 10 Rs. has been awarded to Datar Gunesh Purshram who passed the last Matriculation examination from the Amraoti Highschool and has joined the Deccan College.

---

We thankfully acknowledge the receipt of a copy of the second Annual Report of the Berar Branch of the Countess of Dufferin's fund.

---

The Berar Branch has upto date collected as grugal contribution and as special Jubilee card subscriptions Rs. 46, 761-12 -3. The amount is pretty large and the greater part of it appears to have been paid by the natives of Berar in small sums as subscriptions.

---

## वऱ्हाड.

प्रोफेसर छत्रे हे आपले सरकसचे येथे चार पांच खेळ करून गेले आठवड्यात येथून खामगावांस गेले.

---

"वऱ्हाड हायस्कुल माजी विद्यार्थी समाज" ची पहिली सभा गेले महिन्याचे २६ व २७ तारखेस भरली. सरासरी १५० वर लोक जमले होते. प्रोग्राममध्यें लिहिल्या प्रमाणें सर्व कामें मोठ्या व्यवस्थेनें व उत्तम रीतीनें झालीं.

---

रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापरडे यांचे समाज कामास आरंभ होण्याच्या वेळचे भाषण, रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. यांचा निबंध व रा. रा. दामोदर गणेश पाध्ये एम. ए. यांचे व्याख्यानें ही फारच उत्तम झाली. समाजाचे प्रेसिडेंटांनीं विनंती केल्या वरून रावसाहेब श्रीराम भिकाजी जटार यांनीं जे थोडेसें भाषण केलें ते तर फारच मनोवेधक होतें. ते म्हणाले हा समाज पाहून मला अत्यानंद झाला व आज जर डाक्टर सिंक्लेर साहेब हा समाज पाहण्यास जिवंत असते तर त्यांच्या परिश्रमाचे हे असे चीज झालेले पाहून त्यांस फारच आनंद झाला असता. शेवटी समाजाचे काम आटपते वेळी रा. रा. खापरडे यांनी जे भाषण केलें ते फारच समयोचित व रसाळक होतें.

---

कर्नल एफ. डब्ल्यु. ग्रांट साहेब डे० क० यांस सहा महिन्यांची स्पेशल रजा मिळाली व ते पुढील महिन्याचे ११ वे तारखेस रजेवर जाणार असे म्हणतात.

---

मि. एन. आर. केवरनेज साहेब डि० सु० पोलिस ह्यास १८ महिन्यांची फर्लो मिळाली व ते या महिन्याचे २० तारखेचे सुमारास रजेवर जाणार.

---

पुसद येथील तहसिलदार रा. रा. कृष्णाजी अनंत यांस तीन महिन्याची रजा मिळाली व त्यांचे जागीं रा. रा. बाळाजी राजाराम वाशीम येथील डे० क० चे क्लार्क आफ कोर्ट यांस नेमलें.

---

मे० कारडरो सा० रेसिडेन्ट हे चालू महिन्याचें १९ तारखे पासून रजेवर जाणार व त्यांचे जागीं सर चार्लसबरनार्ड हे येणार अशी वदंता आहे.

---

ले० बार्नीश रेडड असिस्टंट रेसिडेंट हे लवकरच रजेवर जाणार असे म्हणतात.

मि० पी. थोरोस ह्यांस येथील डे. क. चे कायमचे डे. क्लार्क आफ कोर्ट नेमले, व हल्ली ते मि० महमद इस्मायल रजेवर असल्या मुळें आकटींग क्लार्क आफ कोर्ट आहेत.

---

कामा ब्यारिस्टर यांची १० रु. ची व्हिक्टोरिया ज्युबिली स्कालर शिप गेले म्याट्रिक्युलेशन परिक्षेत पसार झालेले उमरावती हायस्कुलचे विद्यार्थी गणेश परशराम दातार यांस मिळाली.

---

## वर्तमानसार

बिजयानगरमच्या राजांस व्हैसराय साहेबांच्या कौन्सिलचे सभासद नेमिलें.

महाराज दुलीपसिंग यांची नेमणुक बंद करण्याचा सरकारचा विचार चालला आहे.

सर हॉरेस बंबोलड यांचें निजामावर घेणें.— सर हॉरेस बंबोल्ड ह्या नांवाच्या साहेबांचा निजाम सरकारावर कांहीं दावा चालु होता व त्याबद्दलची चौकशी निजाम सरकारानें पंचमार्फत करावी असें इंग्रज सरकारानें ठरविलें होतें. त्याप्रमाणें पंचमार्फत चौकशी होऊन, दीड वगैरे २ लाख रुपये निजामसरकारानीं देऊन आपसात मिटवावा, असें ठरलें. ह्या वादांचे स्वरूप काय आहे वगैरे गोष्टी बाहेर येणें आवश्य आहेत हे साहेब निजामसरकारास एवढ्या मोठ्या रकमेबद्दल कर्शी धनको झाले होते, वगैरे गोष्टी लोकांस कांहीं माहित नाहींत. वरील आपसांतला निकाल पंचांनीं हुजुरांस कळविला आहे व त्याप्रमाणें हुजुर काय करितात इकडे सर्वांचें लक्ष लागलें आहे.

अयुब्रखानाला बंगलोर येथें कैदेंत ठेवण्याचा सरकारचा विचार आहे. सु. प.

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

रा॰ रा॰ वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः-

वि॰ वि॰ येथें मेसर्स रामचंद्र वासुदेव कोल्हटकर आणि को. या नांवानें एक कंपनी स्थापन झाली आहे. ही गोष्ट सर्वांस माहित आहेच. या आकोल्या सारख्या छोट्या शा शहरांत कंपनीची सहा दुकानें असणें ही गोष्ट येथील लोकांस फारच भूषणास्पद आआहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. ह्या सहा कंपन्यांपैकीं पांच गांवांत व एक पेठेंत अशा आहेत. पूर्वीं स्थापन झालेल्या पांच कंपन्यामध्यें कोठें फक्त कापड, व कोठें कापड व स्टेशनरी वगैरे सामान मिळतें. परंतु विशेष आनंद मानण्यासारखी गोष्ट ही कीं, मेसर्स कोल्हटकर आणि को ह्याचें दुकानीं कापड, बहुत करून सर्व प्रकारची पितळेची, तांब्याची, लोखंडाची वगैरे भांडीं, स्टेशनरी सामान, पुण्याची दगडी सुपारी, फळफळावळ, व सर्व प्रकारच्या पोथ्या पुस्तकें वगैरे हरतऱ्हेचें व उपयुक्त सामान मिळतें. या शिवाय एडिटरराव येथें कपडे शिवण्याचें संबंधानें फारच त्रास सोसावा लागत असे. तो त्रास लोकांस पडूं नये म्हणून या कोल्हटकर कंपनीनें ( सुईंग कंपनी ) या नांवानें ही एक कपडें शिवण्याचें दुकान स्थापन केलें आहे. हें दुकान ( ह्मणजे शिवण्याचें ) पूर्वीं निराळ्या जाग्यांत होतें, परंतु हल्लीं सुमारें आठ दिवसांपासून पहातों तों हें दुकान कंपनीनें आपल्या भांड्यांच्या दुकानांत नेलें. स्थलांतराचें कारण काय असेल ते असो. तें मला चांगलेसें समजलें नाहीं. कोणी ह्मणतात शिंप्याकडून कांहीं अफरातफर होऊं लागली. कोणी ह्मणतात दुकानचें भांडें देण्यापुर्ते देखील उत्पन्न शिवण कामांत होईना तें कांहीं असो.

आपल्या लोकांचीं मनें हल्लीं व्यापाराकडे लागलेलीं पाहून कोणाला आनंद वाटल्या वांचून रहाणार आहे! विद्या शिकून केवळ कोठेंतरी १०—२०रुपयावर अगर ४०—६० रुपयांवर एखादी नोकरी करून उदर्निर्वाह करण्यापेक्षां अशा तऱ्हेचे स्वतंत्र धंदे करणें फार चांगलें आहे.

असो पत्रकर्ते महाराज आकोलें येथें पूर्वीं पांच कंपन्या होत्या व ही कोल्हटकर कंपनी सहावी स्थापन झाल्यामुळें, व ह्या कंपनीचे दुकानीं निरनिराळ्या तऱ्हेचा माल मिळणार, व शिवण कामाची जी आज पर्यंत लोकांस मोठी अडचण पडत असे ती ही दूर होणार वगैरे गोष्टीमुळें मलाचसा काय परंतु सर्वांसच मोठा आनंद वाटत होता. परंतु एडिटरराव सर्व निष्फळ हो निष्फळ. ह्या कंपनीचा बाहेरील डामडौल व दुकानापुढें चिकटविलेल्या व टांगलेल्या जाहिरातींच्या व कंपनीतील कांहीं ( शेअरहोल्डरांच्या ) ह्मणजे भागीदारांच्या केशरी गंधाच्या व ज्याम्या निम्यांच्या भपकेदार झोकावर व लांबलांब बातावर व कंपनीचे दुकान म्हणजे प्रामाणिकपणाचें घर [ तेथें लहान मूल गेलें तरी योग्य किंमत घेऊन माल दिला जातो अशी जी आजपर्यंत लोकांची समज होऊन गेली आहे ] अशा प्रकारच्या गोष्टीवर भरंवसा ठेवून आजपर्यंत बरच लोक यांच्या तडाक्यांत सांपडून चुरमुरे खात बसले आहेत.

सुमारें महिन्या दीड महिन्यापूर्वीं ह्याच कंपनींत मालांच्या किमतीच्या संबंधानें कांहींच धरबंध नाहीं व व एक जण म्हणतो सव्वा रुपया दुसरा म्हणतो बरा आणि तिसरा म्हणतो नाहीं नाहीं सव्वा दोन रुपये वगैरे सारख्याच अव्यवस्थेच्या संबंधानें आपल्या पत्रांत त्या कंपनीचे म्यानेजरास एक सुचनार्थ लेख आला होता असें मला वाटतें. तो लेख वाचून म्यानेजर साहेब बरेंच लोकांजवळ असे म्हणाले कीं आमचें दुकान नवें आहे अद्याप किंमती वगैरे बरोबर लावल्या नाहींत सबब अशी चूक झाली. परंतु पुढें अनुभवां अंती असें दिसून येतें कीं तें दुकान स्थापन झाल्याला २ महिने झालें नाहींत तो जेथें जावें तेथें ह्याच गोष्टी कोणी म्हणतो मी एक तांदुळाचें पोतें विकत घेतलें त्यांत २॥ रुपयाला फसलो. कोणी ह्मणतो मी चारभांडा घेतली ०१२आण्याला फसलो. असें एककीं दोन सर्वच लिहूं लागलों तर पत्र विस्तार होतो सबब इतकेंच पुरे करतो कळावें पत्रविस्ताराची माफी असावी.

हो. पत्रकर्ते महाराज वर पुरे करतो असें लिहिलें व लेखणीला रजा देणार इतक्यांत ह्याच कंपनीचे संबंधानें एक भयंकर व विशेष खेद मानण्यासारखी जी मुख्य गोष्ट ती अगदींच लिहिण्यास विसरलो. तारीख १ माहे मार्च सन १८८८ रोजी सकाळचे सुमारें साडे नऊ वाजतां नदी पलीकडे रहाणारा तीन चार पोक्त व संभावीत गृहस्थ कंपनी या नावाला भुलून कांहीं कपडे शिवण्यास देण्याकरितां कापड घेऊन गेले. नेलेलें कापड कातरून किती कपडे होतात व कांहीं कमी कापड येत असल्यास आणून दे तो वगैरे त्या शिंप्याला सांगत असतां बोल बोलतांकींहो एडिटरराव तो शिंपी त्या बिचाऱ्यांना इतकी अभद्र भाषणे बोलला कीं, ते शद्ब कानीं पडताच अंगावर खरोखर कांटाच उभा रहातो. शिवशिव! काय ही कंपनीच्या दुकानाची स्थिती. काय त्या दुकानातील भागीदारांचा मोठेंपणा तेच शद्ब मी येथें लिहिले असते परंतु असल्या घाणेरड्या शद्बांचा विटाळ माझ्या लेखणीला व आपल्या सुंदर पत्राला होईल या भितीस्तव लिहिले नाहींत. कपडे शिवून घेण्यास आलेले बिचारे त्या थोर व एटबाज शिंप्यास कांहीं एक न बोलतां निमुटपणें पुन्हा त्या दुकानीं न जाण्याबद्दल कानाला खडा लावून घेऊन चुरमुरे खात घरीं निघून गेले.

पत्रकर्ते महाराज अशा तऱ्हेच्या कंपन्या स्थापन होऊन दुसरे तर कांहीं नाहीं परंतु पूर्वीं ज्या सभ्य गृहस्थांनीं मेहनत घेऊन कंपनीची दुकान स्थापन करून खरोखर दुकानची सचोटी अबालवृद्धांचे अनुभवास आणली त्यांचे नावांला ( ह्मणजे कंपनीचें दुकान ह्या नावाला ) खरोखर काळोमा येणार आहे. ही शिवण कंपनी जन्मल्याला सुमारें दोड महिना हो पुरा झाला नसेल. इतक्याच तिनें आपलें कसब दाखविणें सुरू केलें हें पाहून फार दिलगिरी वाटते. असो आणखी पुष्कळ मजकूर आहे परंतु पत्रविस्तार फार झाला सबब आपली रजा घेतो

वरील मजकूर लिहून गेल्यावर नवीन शी एक ताजी खबर मिळाली कीं, वर ज्या गोष्टी लिहिल्या गेल्या त्या होणें अगदी साहजीक आहे. ही कंपनी उपस्थित करणारे, एक सुमारें तीनचार महिन्यापूर्वींच येथें आलेले पोक्त व संभावीत ग्रहस्थ आहेत. कंपनीचें भांडवल सुमारें ५००० रुपयांचे आहे असें ऐकतो. एक दोन भागीदार ( शेरहोल्डर ) खेरीज करून बाकीचे सर्व +++ असेच आहेत असें ह्मणतात. प्रत्येक शेर (भाग) ५०० रुपयांची आहे. एकदोन भागीदार शिवायकरून बाकीचे सर्व असेंच आहेत म्हणजे ज्या ग्रहस्था विषयीं वर मी ते येथें नवीन आलो असून ह्या कंपनीचे उत्पादक आहेत असा उल्लेख केला आहे, त्या गृहस्थाला भर देऊन म्हणा अगर थोडक्याशा भांडवलांत व पुष्कळ नफा होईल अशी आशा दाखवून म्हणा ह्या सर्व शोकी भागी दारांनीं प्रत्येकी पांच पांचशे रुपयांचा दस्तैवज लिहून देऊन खुशाल त्या बिचाऱ्याचे रुपये सुमारें ३००० खर्चीं घालून वाटेल तशी चैन उडवीत असावेत असा अदमास होतो.

पत्रकर्ते महाराज लोकांनीं सरो घातली म्हणुन आपण दोरी घालावी व त्या दोरीचा फास गिऱ्हाईकांचे गळ्याला लावावा असा प्रकार ह्या नवीन कंपनींत होण्याचे कारण काय असावें बरें? होय मला आठवलें. कंपनीचे बहुतेक भागीदारांची ज्यास्त नफ्यावर नजर असल्यावर तेथें सचोटी कोठूनें रहाणार असो. शेवटी आपणास विनंती इतकीच कीं अजून तरी कंपनीचे म्यानेजर त्या गोष्टी कडे लक्ष देऊन सूधारणा करतील अशी कांहीं तरी आपण त्यांची कान उघडणी कराल काय?

आपण देशहितकर्ते असल्या मुळें हा लेख जरूर येत्या अंकीं प्रसिद्ध कराल अशी आशा बाळगुन आपली रजा घेतो. पत्र विस्ताराची माफी करावी कळावें लोभ करावा हे विनंती. पुन्हा भेट घेईन.

आपला

राम

वाशीम १०।२।८८

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांसः—

साष्टांग नमस्कार वि. वि. तारिख ९।२।८८ इसवी रोजीं दोन वाजण्याचे सुमारास येथील लायब्ररीच्या समोरील बोहरे यांचें एक दुकान आहे. त्या दुकानांत दुकानचा मालक बोहरा फटाक्याचें काम करात असतां एकाएकीं वर्शीणाच्या योगानें अग्नी पडून जवळ दारू होती त्यांत ठिणागी पडून दारू उडाली व तोफेसारखा मोठा आवाज झाला तेणेंकरून तो बोहारी यानें तर तत्काळ यमसदनाची वाट धरली. बिचाऱ्याची अशी दशा झाली कीं पायांचीं बोटें कोणीकडे उडालीं याचा पत्ताही कांहीं वेळपर्यंत लागेना. नंतर शोधल्या नंतर तीं सांपडलीं. दुकानाचाही कांहीं भाग जळला. व एक लहान मुलगा जवळ होता त्यासही मरणप्राय इजा झाली. अशा अकस्मात इश्वरी कोपामुळें झालेल्या अनर्थ पाहून लोक फार हळहळले. येथें पुष्कळ दिवस लोंबत असलेलें फकीर एकदांचे खालीं बसले. त्यांच्यात फकीरी धन फारसें आहे असें वाटत नाहीं. कारण खालीं बसल्यापासून लफंग्यांच्या संगतीस लागले आहेत. व फकीरा वाशीमच्या लोकांपासून खोट्यानाट्या दांभिकपणानें पैसे उपटण्याची युक्ति लढविण्याकरितां टांगूनही घेतलेस; परंतु आपले यत्न व्यर्थ झाले हें पाहून फार वाईट वाटतें. ह्या साधु महाराजांची स्वारी खालीं बसल्या नंतर त्याच [illegible] एक धटींगण बाबा टोपलीभर भस्म अं[illegible]ऊन बसूं लागले आहेत. परंतु परिणाम त्यांच्या बंधू प्रमाणेंच व्हावयाचा!! आतां पिकें फार भरावर आहेत. परंतु आज रोजीं पाऊस फार पडला यामुळें आतां पिकांची नासाडी होईल. मेघराजा आपली छावणी लवकर उठवील तर गरीबांच्या तोंडांत घांस पडण्याचा संभव आहे. आज रोजीं महादु कलाल वगैरेचे लिलाव झाले. ह्याकरितां बरेच बाहेरचे लोक आले होते. मे. तहशिलदार मंगरूळ व पुसद यांच्या स्वाऱ्या आल्या आहेत.

आपला प्रेमेच्छु "क्ष"

नोटीशोचें उत्तरांचें प्रती उत्तर.

रा॰ रा॰ भागीदार मंडळी व सेक्रेटरी नारायण लक्ष्मण आणि कंपनी आकोलें यांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुमची ता॰ १५–२–८८ चें वैदर्भ पत्रांतील नोटीस ता॰ २९—२—८८ रोजीं दिवसा एक वाजतां पावली. तुमेच लिहिणें, सुचविणें, करणें, अगदीं खोटें आहे दुकानचे रुपये तुम्हांस मागण्याचा अधिकार नव्हता व ती रक्कम कर्जाऊ घेतली न व्हती जो नफा घेण्याचा माझा कायदेशीर हक्क शराकत नाम्या वरून झाला होता त्या रकमेपैकीं हक्क प्राप्त झाल्या नंतर घेतली आहे ती ही जी रक्कम घेणेंचा हक्क मला झाला त्यापेक्षां अधीक न घेतां कमीच घेतली. ज्या शर्थी दुकान चालण्या साठीं शराकत नाम्यानीं मर्यादीत करून ठेविल्या आहेत त्यांचे उलंघन झालें भागी दारांनीं एक मतानीं वागण्याबद्दल ज्या गोष्टी प्रचारांत व कायद्यांत आहेत त्या बाजूस राहुन निराळेच तऱ्हेनें वर्तन दिसूं लागेल सेक्रेटरीनीं मर्यादा सोडून काम केलें तें अनुसरणें ह्या गोष्टी मला पसंत वाटत नाहींत ह्मणुन मी भागीदार रहात नाहीं व भागीदारी मोडला जाऊन जे कायदेशीर मार्ग योजावे लागतात तसें करावें असें लेखी सुचविलें ती तुम्हो सोडून दाखविलेले मार्गास जाता अगर नाहीं ह्याचें उत्तर एकोकडेस राहुन ज्या गोष्टीचा अधिकार महमदअली आणि आहमदअली यांस नाहीं व तुम्ही लिहित तरी कबूल केले नाहीं ती दुसरीच गोष्ट पुढें आणता. कायद्या प्रमाणें माल केव्हां वाटला जातो हे निदान सेक्रेटरीस तरी माहीत असेलच त्या गोष्टी कोणकोणत्या केल्या आहेत हें कळणें जरूर आहे आतां मजकडे देशावरची जबाबदारी किती येते व ती कां यावी आणि माझे हिश्याचा माल पशीलवार कोणता किती रुपयाचा ठेविला आहे व आजवरचा खरा हिशेब काय हें दाखवून ज्या गोष्टीनें माल दिल्हा जातो हे खरें ठरवून दिल्यावर मी माल घेऊन जाईन तुमचें लिहिणें करणें खरें न ठरले तर मी नुकसानास तर पात्र होणारच नाहीं पण उलट माझी रक्कम सदरहु दुकानांत तुमचा स्वाधीन जितके दिवस राहील तितके दिवसांचे व्याज गुदस्त सालीं जो नफा झाला त्या व्याजाचे दरानें माझे पदरीं पडे पर्यंत भरून घेईन व आणखी ही जे कायदेशीर उपाय असतील ते हो करीन कळावें.

तारीख २–३–८८इ०

कृष्णाबाई अज्ञान पालन करणार

यादवराव रामचंद्र

दस्तुर खुद.

☞ हें पत्र आकोला येथें कै॰ बा॰ खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल ७ " १ ०।८
किरकोळ अंकास ............ ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ...... ०१

Per annum in arrears 7 „ 1R. 8 as
Six monthly ............ 3 „ 8 as
Single copy ............ 4 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL. XXII | AKOLA MONDAY 12 MARCH 1888 | NO. 10

वर्ष २२ | अकोला सोमवार तारीख १२ माहे मार्च सन १८८८ इ० | अंक १०

Advertisements.
Below 10 lines...2[illegible]
Per line over 10...4a.
epetition per line...3a

## जाहिरात

Auction.

Of tents, and miscellaneous articles, the property of Mr. N. R. Cumberlege, at his benglow on Sunday 25 th March at 7 A. M.

Vittuji Narayen
Akola 9- 3- 88 District Nazar
Akola.

## लिलाव.

रविवार तारीख २५ मार्च सन १८८८ रोजीं प्रातःकाळचे सात वाजतां मे० एन. आर कंबरलेज साहेब यांच बंगल्यावर त्यांचे खासगी तंबु व इतर किरकोळ सामान याचा लिलाव होणार आहे.

आकोला ९-३-८८ इ०

विठूजी नारायण
डिस्ट्रिक्टनाझर.
आकोला.

## जाहिरात

टपाल खर्च ०४ आणे

**वनौषधी शास्त्र प्रमाणें.**

किंमत एक बाटलीस १॥ रुपया
औषधी सोबत कागद व चमचा.

फक्त एकाच औषधीपासून खाली लिहिलेले सर्व प्रकारचे रोग दूर होतात, व त्या संबंधानें झालेला पत्रव्यवहार व सर्टिफिकिटें स्थलसंकोचास्तव न देतां रोगांचीं नांवें मात्र दिलीं आहेत. उपदंशजन्य, गरमीचे अनेक प्रकारचे रोग, धातु, स्वर स्त्रियांस धुपणी लागते ती रक्त दूषित झाल्यापासून हातां पायांवर डाग पडणें, सर्व त्वचेचे रोग कच्चा पारा सेवन केल्यानें सूज येणें, कळा लागणें व सर्व प्रकारचा संधी वायु, गंडमाळा, पिनस, जठर वात, कडकी अम्लपित्त, पोटशूळ, पोटफुगी, नळवायु, मस्तकशूळ व मुखरोग जिभेवरील चट्टे, दातांतून पू येणें, रक्त येणें व तोंडाची दुर्गंधी आदिकरून सर्व रोग वरील औषधानें दूर होतात.

☞ पत्ता–मुंबई फणसवाडींत बाळकृष्ण भिवाजी नारवेकर यांचे चाळींत
डा. धाकजी भानजी सावंत.
Dr. D. B. sawant.
-12188307-

नोटीस.

रा० रा० कृष्णाजी दिनकर ओव्हरसियर राहणार छावणी आकोले यासी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी तुकाइ मर्दे येकोजी पासून आमचे हवेलीपैकीं उत्तर बाजुकडील भींत व जागा विकत घेतली असें समजल्यावरून आम्ही आपणास आमचे जवळील असलेलें खरेदीखत दाखविलें आणि सांगितलें कीं तुम्ही आपले रुपये परत घेण्याची तजवीज करावी असें असून हल्लीं आम्हास समजलें कीं तह्मी दिवाल खोदून काम करणार करितां नोटीस देणें भाग झालें. सदरहु घरावर व जाग्यावर मालकी माझी असून कबजा आमचा आहे. गोपाळपंत किंवा तुकाई इची मालकी बिलकुल नाहीं. करितां तुह्मी त्या जाग्यावर कोणतेही प्रकारची आगळीक करूं नये जर कराल तर त्याबद्दल आह्मांस योग्य कायदेशीर विचार करणें भाग पडेल कळावें तारीख ९ माहे मार्च सन १८८८ इसवी.

( सही )
गंगाधर जोगवरमठ
दुकान आकोलें.

हिंदुस्थान सरकारचे होम डिपार्टमेंट ( पब्लिक ) चे सेक्रेटरी ए. मॅकझी इस्क्वायर सी. एस. यांजकडून हैदराबादचे रेसिडेंट यांस, पत्र नंबर $\frac{31}{696}$ मुकाम सिमला ता० १३ मे सन १८८९.

एका स्थानिक सरकाराशीं पत्र व्यवहार झाल्यांत हिंदुस्थान सरकारच्या असें नजरेस आलें कीं हिंदुस्थानांत सरकारी नौकरांनीं जमीनी ठेवणें बव्यापारा संबंधीं व्यवहार करणें यांच्या निर्बंधास्तव अमलांत असलेल्या हुकुमांचा वास्तविक उद्देश व अर्थ यांजबद्दल गैर समज झाला आहे. म्हणून स्थानिक सरकार व ॲडमिनिस्ट्रेशन्स यांस सुलभ रीतीनें माहिती होण्याकरितां या बाबतींत असणारे नियम व त्या किल्येकांवर सेक्रेटरी आफ स्टेटच्या अनुमोदनानें हिंदुस्थान सरकारानें केलेले महत्वाचे ठराव यांचा गोषवारा होम डिपार्टमेंटचा ठराव नंबर ९-२२४-२४६ तारीख २० फेब्रुवारी सन १८८४ चा याची पुरवणी ह्मणून प्रसिद्ध करावा असें गव्हरनर इनकौन्सिल यांस इष्ट वाटतें.

सनदी सिव्हिल सर्व्हंट, सिव्हिल खात्यांत असणारे लष्करी कामगार यांस, आणि वर सांगितलेल्या दोन वर्गांपैकीं सनदी किंवा कमिशन्ड आफिसरांना वस्तुतः ज्या सिव्हिल जागा द्यावयाच्या त्या जागांवर असणाऱ्या सर्व इसमास, ज्या प्रांतांत ते नौकर असतील अगर ज्या ॲडमिनिस्ट्रेशनशीं त्यांचा संबंध असेल, मग तो संबंध कायमचा अगर हंगामी असो; त्या प्रांतांत अगर आडमिनिस्ट्रेशनमध्यें जमीन संपादण्याची अगर ठेवण्याचा मनाई आहे. फक्त राहण्याकरितां घर व त्यांच्या अंगभूत असणाऱ्या इमारती वगैरे करितां जी जमीन घेतली असेल तिला ही मनाई लागू नाहीं.

३. हिंदुस्थानचे नेटीव्ह लोक ज्यांस स्टॉट्युटरी नियमांप्रमाणें नेमिलें असेल त्यांस सरकारी नोकरीत शिरते वेळीं त्यांचे ताब्यांत खरोखर जी जमीन असेल अगर त्यानंतर वारशानें, देणगीनें अथवा मृत्यु पत्रा वरून त्यांचे ताब्यांत जी जमीन येईल ती ठेवण्यास परवानगी आहे, मात्र असें ठरविण्यांत येतें कीं त्यांहीं स्थानिक सरकारास त्या जमिनी संबंधी पूर्ण माहिती दिली पाहिजें; म्हणजे ज्या जिल्ह्यांत एखादी जमीन असेल त्या जिल्ह्यांत त्यास नोकरीस ठेवण्यास कांहीं बाध येतो का काय याचा विचार स्थानिक सरकार करतील. स्टाट्युटरी सिव्हिल सर्व्हंटास तो ज्या स्थानिक सरकारचे अमलाखालीं नोकरीस असेल त्याचे मंजुराती शिवाय नवीन जमीन खरीद करण्याची मनाई करण्याची आहे.

४. बिन सनदी ( अनकाव्हेनन्टड ) युरोपियन, युरेशियन अगर नेटिव्ह नोकर ज्याकडे न्याय अगर मुल्की खात्यांत स्वतंत्र अधिकार असेल त्यांस ब्रिटीश इंडियांत शेतकीच्या कामाकरितां जमीन संपादण्यास अगर ताब्यांत घेण्यास हरकत नाहीं. परंतु ते ज्या तालुक्यांत नोकर असतील त्यांत मात्र त्यांची जमीन असूं नये. बिन सनदी नोकरांस जरी जमिन ठेवण्यास प्रतिबंध नाहीं तरी मुनसफ, डेप्युटी कलेक्टर आणि तहसिलदार या सारख्या बऱ्याच अधिकाराच्या व वजनदारीच्या जागा ह्यांच्या ताब्यांत ज्या इसमाच्या जमीनी आहेत त्यांस त्या जागा देणें अनुचित आहे.

५ सर्व प्रकारचे नोकरांनीं ( उमेदवारासुद्धां ) आपल्या ताब्यांत असलेल्या अगर आपण संपादलेल्या जमिनी संबंधी प्रतिज्ञा लेख केला पाहिजे. त्यांत जमीन कोठल्या जिल्ह्यांत आहे ते व आणखी जरूर वाटेल ती माहिती द्यावी. ह्या माहितीचे रजिस्टर ज्या स्थानिक सरकारचा संबंध असेल त्यांनीं ठेवावें.

६. कोणत्या ही खात्यांतील नोकर ज्याचा ब्रिटिश इंडियांत अगर इतर ठिकाणीं जमीन असेल तो आपला वेळ जो त्यानें आपल्या सरकारी, सिव्हील अगर लष्करी कामाकडे खर्च करावयाचा तो त्या जमिनीच्या व्यवस्थेकडे लावणार नाहीं व त्यास त्या कामाकरितां अधिक अगर वारंवार गैर हजिराची रजा देण्यांत येणार नाहीं यासबाधीं+ प्रत्येक स्थानिक सरकारानें काळजी घेतली पाहिजे.

७. सिव्हिल सर्वंट व लष्करी कामगार जे हिंदुस्थानांत हल्लीं सरकारी नोकरीत असतील त्यांस नेटिव्ह संस्थानांत कोणत्याही कारणाकरितां जमीन ठेवण्याची मनाई आहे ही मनाई जी जमीन राहण्याकरितां घर व त्यांच्या अंगभूत असणाऱ्या इमारती वगैरे करितां घेतली असेल तिला लागू नाहीं.

८. शेतकीच्या उत्पन्नाकरितां जमिनींत पैसा गुंतविणें त्याशिवाय करून इतर कोणत्याही प्रकारची कामें अथवा धंदे ज्यांशीं सरकारी कामगारांचा आपल्या हुद्याचे नात्यानें संबंध असून खासगी रीतीनें ही संबंध राहील, त्यांत कोणत्याही पदवीच्या व जातीच्या कामगारांनीं ( तसें करणें जात्या निर्दोष असेल तरी ही ) पैका गुंतवूं नये. सदरील साधारण शरतीस अनुसरून. सरकारी नोकरांस खाणीच्या अगर दुसऱ्या कंपन्या सुद्धां ) ज्यांचा उद्देश देशोन्नती करण्याचा असेल त्यांतील शेअर्स घेण्यास हरकत नाहीं. फक्त त्यांचें त्या कंपन्यांचे व्यवस्थेंत अंग नसावें व ज्या जिल्ह्यांत त्यांचा संबंध असलेल्या कंपनीचें काम चालू असेल त्यांत त्यांस नेमूं नये. ही वर सांगितलेली दुसरी मनाई प्रांताचें काम कांहीं पहाणाऱ्या कामगारांस ह्मणजे लोकल गव्हर्मेंटचे मेंबर्स, बोर्ड आफ रेव्हेन्युचे मेंबर्स व त्यांचे सेक्रेटरी यांस केव्हां केव्हां कमीजास्त प्रमाणानें लागू होईल व असे कामगार ज्या प्रांतांत नोकरीस असतील॥ त्यांतील कोणत्याही भागांत ते ज्या धंद्यांशीं आपला संबंध ठेवितील त्याजबद्दल त्यांहीं फारच खबरदारी ठेविली पाहिजे हें समजावें.

९ एखादे कंपनीचे कामाची व्यवस्था पहाण्याचे बाबतींत असा ठराव झाला आहे कीं ज्या कंपन्यांचा उद्देश देशोन्ती करण्याचा आहे तशा कंपन्यांची व्यवस्था पहाण्याबद्दल सरकारी नोकरांस मनाई नाहीं परंतु अशा कामगारांस ब्यांकी सारख्या कंपन्यांची व्यवस्था पहाण्याची मनाई आहे. आणखीही असा ठराव केलेला आहे कीं एखादे कंपनीची व्यवस्था पहाण्याचे बाबतींत सरकारी कामगारांस जी मनाई आहे ती जे सरकारी नोकर कामावर हजर असतील त्यांस तसेंच रजेवर असतील त्यांसही लागू आहे. परंतु सरकारांतून हक्क मिळालेल्या अशा रेल्वे कंपनींत जे कामगार हिंदुस्थान सरकारच्या परवानगीनें नोकर राहिले आहेत त्यांस व ज्या मंडळ्या व्यापाराकरितां किंवा व्यापारापासून नफा करून घेण्याकरितां नव्हे परंतु आपापसांत मालाचा पुरवठा मिळण्याच्या सत्य बुद्धीनें स्थापन झालेल्या आहेत अशा मंडळ्यांची व्यवस्था करणारांस सदरील मनाई लागू नाहीं ( मात्र असें ठरविण्यांत येतें कीं सदरील दुसऱ्या मंडळीच्या योगानें कामगारांस दुप्पट काम करावें लागल्यामुळें सरकारचे कामास हरकत पडूं नये. ) एखादे कंपनीची "व्यवस्था" पहाण्याबद्दल वर जी मनाई सांगितली आहे तिच्या शद्बशः अर्थावरून प्रोमोटर होण्यास अगर कंपनी रजिस्टर करण्याबद्दलच्या मेमोऱ्यांडम आफ असोसियेशनमध्यें नांवें दाखल करण्यास जर प्रतिबंध येत नाहीं, त-

यापि गव्हरनर जनरल इन कौंसिल यांनीं असा ठराव केला आहे कीं जो भयंकर परिणाम टाळण्यास्तव सदरील मनाईची योजना केली आहे. ह्मणजे सरकारी अधिकाराचा दुरुपयोग होणें अथवा सरकारी कामांत इतबारी न रहाणें, हा परिणाम त्या कामगारानें कंपनी काढल्यानंतर तिची व्यवस्था पहाण्यामुळें जसा घडेल त्याहून वरील गोष्टीनें कांहीं कमी डवणार असें नाहीं. ह्मणून कंपन्यांचे प्रोमोटर होणें किंवा त्या दाखल करविणें याजबद्दल सरकारी कामदारास स्पष्ट मनाई केली आहे.

१०. असा एक सरकारचा हुकूम आहे कीं सरकारी नोकरांनीं उलेढाल्याचा व्यापार करूं नये. परंतु जमीन किंवा इतर मौल्यवान मिळकत घेण्याचा व्यवहार केव्हां व कोणत्या प्रसंगीं "उलेढाल्याचा" समजावा याजबद्दल स्पष्ट व्याख्या देण्यांत आलेली नाहीं ज्या जमिनींत सुवर्ण आहे अशी जमीन पुढें कंपनीस विकण्याचे हेतूनें संपादन करून घेणें हा उलढालीचा व्यवहार करणें आहे हें उघड आहे. सरकारी कामगारांनीं हमेषा असा व्यवहार करणें हें वाईट आहे ह्मणून जेव्हां जेव्हां अशी वहिवाट असल्याचें दिसून येईल तेव्हां तेव्हां तिजबद्दल कडक रीतीनें विचार करण्याचें काम सरकारनें आपल्याकडे ठेविलें आहे. कोणत्याही व्यापारांत एकदांच पैसा गुंतविणें व उलेढालीचा व्यापार करणें यातील साधारण भेद बंगाल सरकारास ह्यान डिपार्टमेंटचें पत्र नंबर १४९१ ता० १ एप्रील सन १८७२ चें ज्यांतील उतारा खाली दिला आहे त्यावरून समजून येईल.

११. या बाबतींत जे महत्वाचे हुकूम वेळोवेळीं प्रसिद्ध करण्यांत आले त्याचा थोडक्यांत गोषवारा वर दिलेला आहे. आणि गव्हरनर जनरल इन कौंसिल यांची अशी खात्री आहे कीं तो गोषवारा स्थानिक सरकारास व अॅडमिनिस्ट्रेशनांस व त्यांच्या हाता खालच्या नोकरांस मार्ग दाखविण्यास उपयोगी होईल. सदरील गोषवाऱ्यांत फक्त मोठे महत्वाचेच हुकूम दिलेले आहेत. सर्व दिलेले नाहींत हें स्पष्ट समजावें.

## वऱ्हाडसमाचार.

मिती फाल्गुन वद्य ३० शके १८०९

अलिकडे विलायते वरून ज्या तारा येत आहेत त्यांवरून जर्मनीचे क्राउन प्रिन्स यांच्या बद्दल आतां अगदीं निराशा झाल्यासारखें झालें आहे. हे राजपुत्र आज कित्येक दिवस घटसर्पानें आजारी आहेत व युरोपांतील उत्तम उत्तम वैद्य यांच्या साठीं एकसारखा खटपट करीत आहेत. आतां त्यांची प्रकृती अत्यावस्थ झाली आहे व आज उद्यां केव्हांतरी लवकरच त्यांचा अंत होणार असें स्वरूप त्यांच्या दुखण्यास आलें आहे. हे राजपुत्र आपल्या महाराणी साहेबांचे जांवई आहेत. परमेश्वरानें या राजपुत्राला आणखी कांहीं वर्षे राखण्याची आशा ठेवली असती तर जर्मनीला व सर्व युरोप खंडाला यां पासून पुष्कळ फायदा झाला असतां आमच्या चक्रवर्ती साहेबांच्या जेष्ट चिरंजीवावर आलेला हा प्रसंग पाहून आम्हांस फार हळहळ वाटते.

पब्लिक सर्व्हिस कमिशनचा निकाल पार्लमेंट समोर लवकरच येईल असें चिन्ह दिसत आहे. लार्ड क्रास यांनीं असें म्हणून दाखविलें कीं लार्ड डफरीन "यांची कांहीं हरकत नसेल तर" हा रिपोर्ट लवकरच मी पार्लमेंट पुढें आणतो. लार्ड डफरीन साहेबांची हरकत काय असावी हें आम्हांस समजत नाहीं तथापि लार्ड क्रॉस यांच्या भाषणाचा जो सारांश आला आहे त्यावरून आमच्या व्हाइसराय साहेबांच्या मनांत रिपोर्ट सध्यांच पुढें आणण्याचें नाहीं असें दिसतें. कमिशननें केलेल्या सूचना आमच्या व्हाईसराय साहेबांना पसंत पडत नाहींत असें तर नसेलना? कांहीं असो डोंगर पोखरून उंदीर म्हणा कांहीं म्हणा, लवकरच कांहीं तरी बाहेर येईलः लार्ड क्रास साहेब तिकडे तर रिपोर्ट प्रसिद्ध करतीलच पण त्या बरोबर त्याची नक्कल हिंदुस्थानांत ही लागलींच प्रसिद्ध करतील तर फार बरें होईल. आम्हाला महिना भर उगीच वाट पहात बसावण्यांत आमच्या सरकारला काय श्रेय वाटत असेल ते वाटो.

अलाहाबादच्या पायोनियर पत्रांत निजाम साहेबा संबंधानें कांहीं मजकूर आलेला आहे त्या वरून हैद्राबाद सरकारच्या दरबारांत पुनः कांहीं घोटाळा झाल्याचें कळतें. थोड्या दिवसां मागें निजाम साहेबांनीं आपल्या राज्याचें काम स्वतः मोठ्या हुशारीनें पुष्कळ केल्या बद्दल त्यांची जिकडे तिकडे तारीफ झाली होती. पण आतां ते जनान्याच्या बाहेर तर येत नाहात असें म्हणतात. त्यांचा सर्व मनाचा उत्साह जाऊन त्यांची वृत्ति सध्यां उदास व खिन्न झालेली आहे. त्या प्रमाणेंच ६० लक्ष रुपयांची देणगी थोड्याच दिवसां मागें त्यांनीं इंग्रज सरकारास केली तीच्यांत त्यांचे स्वतःचे किंवा त्यांचे सध्यांचे दिवाण सर आस्मान जाहा या दोघांचें ही मन पासून आंग नव्हतें असें आतां उघडकीस आलें आहे. या व यासारख्या दुसऱ्या अनेक गोष्टी बाहेर आल्या आहेत त्यावरून असें दिसून येत आहे कीं निजाम सरकारची स्थिति सध्यां केवळ बाहुल्या प्रमाणें झाली आहे. ही सर्व हकीकत खरी असेलतर आम्हांस त्याचें फार वाईट वाटतें. निजाम साहेबांसारख्या पहिल्या प्रतीच्या संस्थानिकांची अशी दशा झाली असेल तर आमच्या देशाचें दुर्दैवच समजायाचें.

✓ बंगाल इलाख्यांतील जनरल पोलीस यांनीं नुकतेंच आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यामध्यें एक सरक्युलर फिरविलें आहे. त्याच्या योगानें त्या इलाख्यांत राजकीय प्रकरणीं ज्या ज्या गोष्टी होतात मग त्या सभेंत होवोत, मंडळ्यांत होवोत, धर्मसंबंधीं गोष्टींत होवोत किंवा कोठें ही होवोत पोलीस अधिकाऱ्यानीं त्यांवर चांगलें लक्ष देऊन त्यांचा रिपोर्ट प्रत्येक आठवड्यास करीत जावा.

हें सरक्युलर सध्यां बंगाल इलाख्यासच लागूं आहे. आपल्याइकडे त्याचा कांहीं संबंध नाहीं तथापि कित्येक पत्रकारांच्या मताप्रमाणें हा संबंध लवकरच सर्व देशावर लागू होईल असें आहे. आपले सध्यांचे व्हाईसराय साहेब लार्डडफरिन यांचा प्रत्यक्ष हात जरी या सरक्युलरमध्यें नसला तरी त्याबद्दलची सर्व जबाबदारी त्यावरच आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांनीं आपल्या कारकीर्दीच्या अखेरच्या वर्षी जातां जातां लोकांना हें चांगलेंच बक्षीस दिलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

अलीकडे आमचे वंग देशीय बंधु तेथील च आंग्ल देशस्थ बडेबडे कामगार यांच्या मध्यें बरेच वितुष्ट पडत चाललें आहे. आमच्या बंधुनीं राजकीय प्रकरणीं गोष्टींत जरा हालचाल केली कीं ती या महस्थांच्या डोळ्यांत लागलीच खुपूं लागते. मग तिला राजद्रोहा सारखीं भयंकर नांवें ते देऊं लागतात. आमच्या शेजारच्या इतर इलाख्यापेक्षां आमचे बंगाली बाबु सर्व कामांत पुढें आहेत. तिकडील युनिव्हरसिटी इतर युनिव्हरसिट्यांच्या बरीच पुढें गेली आहे व तींतून विद्वानांची संख्याही इकडल्यापेक्षां पुष्कळ पटीनें अधिक होते. वर्तमानपत्रें ही इकडच्यापेक्षां तिकडे पुष्कळ अधिक आहेत. या सर्व गोष्टी तिकडील आंग्लो इंडियनास आवडत नाहींत असें दिसतें. हा अवस्था इलबर्ट साहेबांचें बिल पुढें आल्यापासून आम्ही आजपर्यंत एकसारखी पहात आहोत. हें सरक्युलर निघण्याला आजच काय कारण झालें हें सांगता येत नाहीं, तथापि त्याच्या योगानें बंगाल्यांतच काय पण सर्व देशभर चळवळ होण्याचा संभव आहे. आमच्या इकडील पोलिस खातें अगोदरच दांडगे जुलमी आहे अशी रड निरनिराळ्या प्रांतांतून नेहमीं येकूं येते मग या सरक्युलरानें तर या लोकांच्या हातीं एक मोठी सत्ताच आल्या सारखें होऊन निशाच्या हातीं कोलित दिल्या प्रमाणें होणार आहे. सध्यें प्रेस आक्टची बातमी निघाली होती तीत कांहीं व्यत्यय आल्या मुळें तर हा उपाय योजिला गेला नसेल ना? कांहीं असो आयरलंडमधील कोइर्शन कायद्याचें नांव जरी याला देता येत नाहीं तथापि पर्यायानें त्याचें हें एक लहानसें पिलूंच आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं आमच्या बंगाली बाबुनीं याप्रसंगा कांहीं उतावळपणा न दाखवितां स्वस्थ बसून हें सरक्युलर अमलांत कोणत्याप्रमाणें येतें हें पहावें. अमलबजावणी होऊं लागली ह्मणजे त्याचें व्यंग तेव्हांच सरकारच्या लक्षांत येऊन ते बंद पडेल. सध्यां शांतपणें बसून काय काय होतें हें लक्ष देऊन पहावें हेंच योग्य आहे.

## The Berar Samachar

MONDAY MARCH 12, 1888

### WHAT IS ESSENTIAL IN INDIA'S CIVILIZATION?

In all countries material prosperity is advanced in proportion to the growth of civilization. Is the same applicable to the case of India? Can it be affirmed that India is no exception to this rule and her civilization is not a bane to her? Evidently the answer is negative. Our civilization, from a cursory point view, appears most dazzling and imposing to the eye of European travellers, but a thoughtful person, who penetrates deeper into the matter, cannot be deluded in this way. To him the consideration of the future of India and the fate that awaits her immense population is most shocking. Inspite of the rapid advance of civilization and political activity, the great stir caused by the enthusiasm of the people for imitating the western nations, the application of scientific principles in industrial arts, and the consequent rise of trade, the communication opened by steam telegraphs, and railway, and the spread of education, the material prosperity of India is not at all increasing.

The people of India are becoming poor, and are being plunged in hopeless and abject misery. The agricultural class, nay even all classes educated and non- educated labouring and commercial, are getting worse and worse and the battle of life is becoming harder. All are required to struggle hard even for the bare maintenance of life. There has been a great rise in the prices of the necessary articles of food; one is required to spend more than he used to do before to enjoy the same kind of luxuries; the average cost of bare maintaenance is trifled, and not withstanding this state of things wages have gone down comparatively very low and labour has become so cheap that the remuneration which is obtained is hardly sufficient to cover up half the cost of maintenance. Our wealth is being drained away in the shape of exhorbitant taxes. The state of our labouring classes is pitiable, or with all their hard labour from morning to evening many of them are dying for want of food. We are making a great cry and agitation for social reforms and political rights and does it behove us to blind our eyes to the unavoidable evil that threatens to make our condition more and more depressed, and our homes miserable. Should it not open our eyes and prepare us not only to find out the causes that are working to undermine us, but to remove them by turning the attention and efforts of our people towards them. It is no use wishing back our old native Governments but we should continue and make a great movement to eradicate the evil that is undermining our society. We have to learn many things as regards trade and from their rulers and we wish to point out to them the chief points which they should imitate. The subject is very comprehensive, but we shall try to touch only the mostly important points. Apart from the evils of overtaxation, foreign government and the circumstances attending necessarily on it, we wish to point out the defects in our systems of trade, industry, social customs and intercourse &c. which must be got rid of to facilitate material development.

(To be continued.)

### MR. GLADSTONE ON "THE ENGLISH IN INDIA."

We are much pleased to observe that the number of our sympathisers in England is increasing, and attempts are made to remove the darkness and ignorance regarding Indian matters and to make English statesmen more and more enlightened on Indian topics. This may be looked upon as a great move in the political history of India and a move which makes us sanguine of her future prosperity. We are much obliged to Mr. Herbert Glad-

stone for his able and instructive lecture on 'the English in India,' at the Gladstone Hall, New Wortley. Before dealing with the subject in hand he ably and clearly pointed out its natural importance, and affirmed that the future welfare of India solely rested with the electors of Great Britain and Ireland. He pointed out that in order to know India it was necessary to know its religion, and then showed how firmly Hindoos cling to their religious ideas, and superstitions, how the spirit of conservatism pervades them, how, as a necessary consequence they are peaceful and contented and how they have yet preserved their old rude implement and systems of carrying on trade. He next passed over the history of India past and present, the Afghan war in 1838 42, the career of Lord Lytton, the Governor General, and the Mutiny. He condemned the policy of Lord Lytton and proved by the evidence of acts that the English Government was from time to time involved in danger, simply because it took no proper steps to remove in time the discontent of the people. He then remarked that the governing of India isl becoming more complex and delicate, on account of the wide spread of education. The people have imbibed western ideas and principles of politics they have now a very influential press, through the medium of which they criticise freely the policy of Government and openly declare what their grievances are. He remarked 'Public opinion has sprung into existence in India, and it is a public opinion in direct communication with England. He then gave a historical description of India's past, and showed that it contains various tribes, which have conflicting interests with one another. Further on he observed 'we saw all over India the wish of the educated portion of the community to hold increased influence and to bare a more direct share in the Government of the country. At the same time we see that the number of these aspirants is increasing; that they are more and more conscious of the power, arising from combination applied to vast numerical force, that the hard and fast rules of the caste system, the chief opponent to combination, are even becoming more and more elastic and so it behoves us on the ground of prudence, if we could not rise to the height of justice, to use every effort to meet and satisfy admitted wants and just wishes in a generous ungrudging and timely spirit. And lastly he insisted that the great twin objects should be to keep the Government strong and honest and to do full justice to the need, the wishes and the sentiments of the people. This has exactly been the thing advocated by us during past years.

In the retirement of Doctor Moo the Bombay Presidency has lost one of its ablest and most zealous medical servants his abilities are known to the general public by his popular work entitled "a manual of family medicine for India."

The latest aditious made to it in the fourth edition are a valuable improvement in the work. To his subordinates he was very kind and affable he advanced their interests and gave a thoughtful consideration to every reasonable representation that was made to him. He is regarded as an authority on medical questions. A service dotes back to a time before the Mutiny. He had made much travel and know fully well the condition of the districts which he had visited. He had to do very hard service in the beginning; but with him work was pleasure. The regret felt at his departure is very enthusiastic and well deserved. We place him before the Berar medical men as a model for limitation. It is often said and said with truth that doctors and missionaries have done much to cultivate and improve the commerce between Europeans and natives.

European doctors have many opportunities of meeting all classes of natives whether higher or low rich or poor and their influences cannot but be felt. It is their duty therefore to keep towards natives behavour that will awake an interest, command, attention and excite sympathy. Friendly relations with such men will do more to root out rude and barbarous practices that hang about Aryan institutions from time immemorial. Dr. Moor. was as popular with natives as with Europeans his zealous regard for duties is admirable. A full account of his career is givent in the Times of India of the first instany and we refer those who might be speciall interested in him to that issue.

It is announced that all hopes in the recovery of the crown prince of Germany have been lost. The shock will indeed be very severe to his old father the Emperor of Germany and not less severe to his mother-in-law our gracious Queen and Empress whose eldest daughter as our readers know is the wife of the prince. His death will be attended as we surmise with serious political consequences. The crown prince was peace loving and had done much to preserve the balance of peace. His younger brother who will succeed to the throne is generally guided by the advice of prince Bismark. The latter is for war and had it not been for a check on his warlike policy, Europe would erelong have been plunged in a disasterous war. We deeply sympathise with Her Majesty for this expected bereavement which we hope she will by the grace of God suffer with great fortitude. We also sympathise with the princess who has to lose a loving and faithful husband. The Times of India justly remarks that the death of the crown prince would be a greater shock to the peace of Europe than the death of the Emperor would itself have been the public mind was much exercised by the doubtful bulletins that were lately received and such result was not altogether unexpected. The event will be a new leafin thepolitics of Europe.

The Gayakwao has just returned from England and before his people had time to see him he ran off again to the Nilgherries we do wish that the health of our Maharaja should not suffer but we may allow to remark that it would not be conclusive to good Government if the Maharaja remains away from his people for a prolonged period. Is it not possible to find in the dominions of the maharaja a cool place where he may go to during the hot season. The people loudly compliance against the viceroy or the governers migration the hills. The reason is obvious and ruler must as far as possible be in touched with the people. They saythat more work is gone through in a cool climate than in a hot one; but we have not lost our faith in the mechanical means that are used to make heat as little felt as possible. And for governors or maharaja's it is not difficult to become and y the best means possibly. We do not grudge the maharaja presenttrip, but we take this occasion to put before him the subject in order that he might teach a lesson to the British Government in this matter.

FROM HYDERABAD RESIDENCY ORDERS, MARCH 1, 1888.

Mr. Y. R. Viccaji, Assistant Superintendent of Police, Amraoti District, has been granted privilege leave for one month with effect from the 15th February 1888, or from such subsequent date as he may avail himself of it.

Captain R. V. Garrett, Assistant Commissioner of the 3rd Class, is transferred from Amraoti to Morshi in the Amraoti District.

So much of Residency Orders Notification No. 1, dated 3rd January 1888, as relates to the transfer of Dastur Edalj Bymonji Assistant Commissioner, is hereby cancelled.

## पेंच

रा. रा. नारायण गंगाधर उर्फ बाळुकाका यांस वाशमास गेल्या तारखेस देवाज्ञा झाली हें कळविण्यांस आम्हास वाटतें. हे गृहस्थ शाळा खात्यांत नोकर होते. त्यांनां आतां नुकतेंच पेनशन घेतलें होतें हे स्वभावानें फार चांगले होते व त्या योगानें, त्यांचे पुष्कळांशी चांगला स्नेह असे, व यांच्या मरणा मुळें ते सर्व हळहळत आहेत.

बुरडाणेकर आपलें पत्र पावलें. तें उशिरां आलें पुढील अंकीं त्यास बहूत करून जागा मिळेल.

## वऱ्हाड.

हवामान—गेल्या आठवड्यांत दोन तोन दिवस आकाश आभ्राच्छादित होते पाउसही बराच आला. हवा उष्ण होत चालली आहे. रोगराई ह्मणण्यासारखी नाहीं.

मि वापू आर व्हिकाजो, अ० सु० पोलीस यास एक महिन्याची रजा मिळाली.

क्यापटन् आर. व्ही. ग्यारेट अ. क. याची उमरावतीहून मोर्शीस बदली झाली.

कर्नल ग्रांट सा. डे. क. गेले आठवड्यात येथें आले.

कर्नल ग्रांट सा० रजेवर जाणार तेव्हां त्यांचे जागीं मि. निकोलेट साहेब बुलढाण्याचे डे. क. येथें येणार अशी वार्ता आहे.

मि० एन्. मेर जु० क० आफिसांतील सेकंड क्लार्क यांस बुलडाण्यास डे० क० चे हेड क्लार्क नेमण्याची वाटाघाट चालली आहे. म. कमिशनर सा० त्यांची शिफारस करीत आहेत व डे० क० त्यांस जिल्ह्यांचे आफिसांतील कामाचा अनुभव नाहीं म्हणून नाकारीत आहेत, असें समजतें.

जु० क० यांची स्वारी सेशना करितां येथें लवकरच येणार.

गेले आठवड्यांत रिधोऱ्यास वीज पडून तीन माणसें मेली असें समजतें.

येथें विंचूरकर संगीत नाटककार मंडळी आली आहे त्यांनीं परवां संगीत संजीविनी नाटकाचा प्रयोग करून दाखविला. खेळ बरा करितात.

रा. रा. साटे नाटककार मंडळीही येथें आली होती परंतु खेळ न करितां खामगांवास निघून गेली.

मलकापूर व मेहेकर येथील नायब तहासिलदार पुढील महिन्याचे पाहिलें तारखेपासून पेनशन घेणार आहेत.

वऱ्हाडांतील दिवाणी कोर्टाची उन्हाळ्याची सुटी ता० २० एप्रीलपासून ता० ५ जून पावेतों व्हावी अशाविषयीं सावजानिक सरकारास लवकरच अर्ज करणार आहे. यंवे शिक्षणसंबंधानें सभेचें मत तयार झालें असून तें लवकरच सरकाराकडे पाठविण्यात येईल.

रा० विश्वनादम मुदलीयार आक्टिंग ए० अ० कमिशनर यास रा० अंबादास संतो यांचे जागीं कायमेच फर्स्ट ग्रेड तहासिलदार नेमिलें.

मे० सांडर्स साहेब कमिशनर ता० १२ रोजीं मुंबईकडे जाऊन नंतर हैद्राबादेस जाणार असल्याचे समजतें

मे० सुरजनारायण असि० क० हे रजेवरून परत येऊन वाशमास जाऊन कामावर रुजूं झाले.

मि० सावत मीरखान तहाशिलदार वाशीम हे तीन महिन्यांचे रजेवरून जाणार व त्यांचे जागीं रा० बाळाजो राजाराम क्लार्क आफ कोर्ट वाशीम यांस नेमणार असें कळतें.

रा० वासुदेवराव पिसोळकर क्लार्क कमिशनर कोर्ट यांनीं तीन माहिन्यांचे रजेकरितां अर्ज केला आहे.

मे० कार्डरो साहेब हैद्राबादेहून चार महि न्यांचे सिक रजेवर विलायतेस जाण्याकरितां गेले. त्यांचे जागीं मे. हावेल सा. हुसंगाबादचे कमिशनर यांस नेमिलें असून ता. ७ रोजीं हैद्राबादेस जाण्याकरितां पंचमडीहून ते निघाले असें समजतें मे० हावेल सा. सन १८८१ सालीं वऱ्हाडांत कांहीं दिवस कमिशनर होते व त्यांची विद्वता, न्यायबुद्धि व निस्पृहता इतकी सुप्रसिद्ध आहेत कीं त्यांची नेमणूक झालेली पाहून वऱ्हाडांत व हैद्राबादेस काय पण इतर प्रांतांतही आनंद झाला.

## वर्तमानसार

जर्मनीचे राजे एम्परर वुइल्यम मरण पावले.

— हिंदुस्थान सरकारानें असा ठराव केला कीं विद्येच्या संबंधाच्या बी. ए. व एम. ए. ह्या पदव्या सरकारी ग्याझिटांतील जाहिरातींत दाखल केल्या जाणार नाहींत; परंतु धंद्याच्या संबंधाच्या व केवळ सन्मानार्थ दिलेल्या एम बी, एम. डी. किंवा डी. डी. अशा पदव्या दाखल केल्या जातील.

— चीन देशांत कापड, साखर वगैरे पुष्कळ पदार्थ रशियांत तयार केलेले खपतात. इंग्लंडपेक्षां रशियाचा माल अधिक खपतो असें समजतें.

— खर्चाचा प्रकार— हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी यांणीं मि. बारींगटन. ब्रैन, भूगर्भशास्त्रवेत्ते, यांस ब्रह्मदेशांतील माणिकांच्या खाणी विषयीं रिपोर्ट करण्याकरितां पाठविलें आहे. यांस दोनशे पौंड ह्मणजे दोन हजार रुपये दरमहा पगार, शिवाय त्यांचा वास्तविक खर्च द्यावयाचा. सहा महिन्यांचा तर त्यांशीं करार केला आहे. मग किती दिवस लागतील ते लागोत.

— लार्ड लान्सडौन हे आक्टोबरमध्यें कानडाहून विलायतेस जातील व तेथून लागलेच हिंदुस्थानांत येणार. तसेच लार्ड डफरिन सिमल्याहून नोवेंबरमध्यें निघून मुंबईस येणार आणि लार्ड लान्सडौन आल्याबरोबर ते विलायतेस जाणार. असें इं. कर्ते ह्मणतात.

— वेस्टर्न इंडिया ल्यांड बिल्डिंग आणि मार्गेजिंग कंपनी नांवाची एक नवीन मंडळी स्थापन झाली आहे. मुंबई इलाख्यांत व सर्व हिंदुस्थान देशांत जमिनी विकत घेऊन त्यांजवर इमारती बांधण्याचा तिचा हेतु आहे.

— इटालीच्या व आबिसिनियाच्या फौजांची लवकरच लढाई होईल तेव्हां लोकांनीं इटलीच्या लोकांस घालवून देण्याच्या कामीं मदत करावी ह्मणून आबिसीनियाच्या सरकारानें जाहीरनामा प्रसिद्ध केला असें कै. च्या तारेवरून समजतें.

— वाडी हालफाच्या जवळ इंग्रज लोकांची एक छावणी होती तिजवर इजिप्तच्या लोकांनीं हल्ला करून एक लेफटेनेंट व दोन शिपाई यांस धरून नेलें असें कै. च्या ता. २६ च्या तारेवरून समजतें.

— काळजाच्या रोगांस (हार्ट डिजीज) उपाय काय तो मुख्यत्वें श्रम न करितां अगदीं स्वस्थतेचा आहे असें समजतात. परंतु प्रोफेसर आरेफल हे तो रोग बरा क्रमाक्रमानें नियमीत प्रमाणानें डोंगरावर चढण्याच्या उपायानें बरा करतात असें ह्मणतात.

— सबार्डिनेट माजिस्ट्रेटाची परीक्षा. ही परीक्षा मुंबईतील टौनहालांत ता. ३ व ४ मे रोजीं होईल. उमेदवारांनीं आपले अर्ज मार्चच्या ३१ तारखेच्या अंत पाठविले पाहिजे.

पंजाब इलाख्यांत सन १८८६।८७ सालांत प्रवाशांच्या सुखसोईसाठीं १०० रु० पासून ५००० रु० पर्यंतचीं शंभर कामें एकंदर ४७००० रु० चीं झालीं. त्यांत बाग, विहिरी, धर्मशाळा, तळीं, पूल व रस्ते अशीं लोकोपयोगीं कामें झालीं हीं सर्व लोकांच्या खासगी देणग्यांनीं झालेलीं आहेत ह्मणून विशेष समाधान मानण्यासारखी गोष्ट आहे.

ब्रह्मदेशांत अद्यापि स्वस्थता झाली नाहीं सरकारी अधिकारी मात्र तसें ह्मणतात; परंतु वर्तमानपत्रांचे बातमीदार तर अद्यापि अस्वस्थता असून दंगे धोपे चालू आहेत व शेती व व्यापार बंद पडला आहे. असें ह्मणतात. खरें काय आहे कोणजाणें. हिंदुस्थानचें व ब्रह्मदेशाचें पातक केव्हां संपणार कोणजाणें.

सु. प.

रणवीरजंग हे काशीस आहेत.

गायकवाड सरकार नीलगिरीस गेले.

केटा जिल्ह्यांतील एक ठेकेदार आपल्या दोन नौकरांसह बर्फांत पुरून मरण पावला.

सिंध देश पंजाब सरकारच्या ताब्यांत देण्याचें घाटत आहे.

येत्या एप्रिल महिन्यांत सर लिफेल ग्रिफीन स्वधामीं जाणार. फार चांगलें.

कलकत्यास एका बारा वर्षांच्या मुलीनें एका युरोपियन सात वर्षांच्या मुलीस शिवीगाळ केल्यानें तेथील माजीस्त्रेटानें तिला एक महिन्याची शिक्षा दिली! चमत्कारच!

गंगा नदीवर जो पूल बांधला आहे, त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या पासून जो कर घेण्यांत येतो, तो बंद होणार. ठीक आहे.

हावडा स्टेशनाजवळ एक मनुष्य रेल्वे खालीं सांपडून चिरडला.

बंगाल्यांतील धर्मसंबंधीं व इतर सभांतील व्याख्यानाचा व इतर चळवळीचा गुप्त रिपोर्ट घेत जावा, अशाविषयींचे वट हुकूम जनरल पोलीस सुपरिन्टेन्डेन्टा कडून आपापल्या लहान मोठ्या कामगारांवर सुटल्याचें समजतें. खरें असल्यास कांहीं दिवसांनीं ऐर्लंडच्या कायद्याचें मंगलाचरणच झालें ह्मणावयाचें.

नवी बंदूक. डा. गार्डलिंग यांनीं पोलीसच्या उपयोगीं पडणारी एक नवीन बंदुक तयार केली आहे. ह्या बंदुकीनें दंग्याच्या वेळीं पाहिजे त्या दिशेला एका मिनिटांत एक हजार आवाज काढतां येतात. इतकी ती सामर्थ्यवान् आहे.

सोन्याची खाण--धारवाड जिल्ह्यांत गदग येथें सोन्याची खाण सांपडली असून त्यांत सांपडलेल्या १९ अंस सोन्याचो एक लगड विलायतेस ही पाठविण्यांत आली. व सदरहु खाणीचा मक्ता मुंबई सरकारापाशीं मागण्यांत आला आहे. अशी बातमी 'डेकन हेरल्ड' पत्रांत लिहिली आहे.

बजेट. हिंदुस्थानच्या जमाखर्चाचें येत्या सालचें बजेट ता० २४ किंवा २६ मार्च रोजीं प्रसिद्ध करण्यांत येणार.

हिंदुस्थानचे कायदे कौन्सिलांत ल्यांड रिव्हिन्यू आणि रेंटकोड ह्मणून एक नवीन कायदा होऊं घातला आहे. यांत सर्व इलाख्याचे रिव्हियूला एकत्र करणार आहेत.

अलाहाबादेस पुढील वर्षी भरणाऱ्या राष्ट्रीय सभेकरितां एव्हांपासूनच वर्गणी गोळा होऊं लागली आहे. इतक्यांतच ८००० रुपये जमले असें कळतें फारच आनंदाची गोष्ट!

तयारी. वायव्य सरहद्दीच्या बचावाचीं कामें सुरू करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारानें इंजनेर लोकांच्या नेमणुका केल्या सरहद्दीवर रेल्वेचे रूळ बसवावयाचे त्या कामीं सल्ला घेण्याकरितां एक जर्मन इंजनेरही आणण्यांत आला आहे असें समजतें.

विलायतेस जाणार. भोपाळच्या बेगम साहेबांचा सरलेपल ग्रीफीननें जो छळ केला, त्याबद्दल तिनें लार्ड डफरीन साहेबांकडे एक अर्ज केला आहे. त्या अर्जाची दाद डफरीनकडून लागली तर ठीकच आहे, नाहींतर आपली हकीकत पार्लमेंटापुढें मांडण्यासाठीं बेगम साहेब विलायतेस जाणार आहेत असें इं. डे. न्यूस. पत्रांत लिहिलें आहे.

रोमच्या पोप महाराजांच्या संग्रहीं प्रतिवर्षी ९० हजार मद्याच्या बाटल्यांचा संग्रह असतो वा! खाशी!

ते. मि.

रिणकोस कर्जाबद्दल दिवाणी तुरुगांत टाकण्याची जी रीत आहे ती बंद व्हावी असें सरकारांत घाटत आहे. सावकार लोकांस हा ठराव कांहींसा बाधक होईल असें दिसतें.

ग्रांड मेडिकल कालेजांतून शेवटची परिक्षा पास झालेल्या इसमांना जी एल. एम. एडएस. ही पदवी मिळत असे ती बदलून एम्. बी. ही पदवी यापुढें ठेविली आहे.

गेलेसालीं पोस्टांतून एकंदर ६ कोटि ८० लक्ष कार्ड खपलें. परंतु उत्तराच्या कार्डी यंदा गतवर्षांपेक्षां ९ लक्ष कमी खपल्या. कारण त्यावेळीं त्यांचा आकार जरा मोठा होता. व लोक ते जुळें कार्ड वेगळाले करून उपयोगांत आणीत असत.

चमत्कार— इचल करंजी येथें एका जुनाट पेवाचे तारदखान्यांत एक गृहस्थ बहिर्दिशेस गेला होता. हातांत कांकडा धरून गुदप्रक्षालन करीत असतां पेवानें पेट घेतली. यामुळें त्याच्या आंगाचा बराच भाग जळाला. असें कां व्हावें याचें एक्सपेरिमेंट पाहण्याकरितः पुन्हा कांकडा पेटवून पेवाचे तोंडाशीं ठेविला तों पूर्वीप्रमाणेंच पेवानें पेट घेतली. तेव्हां कावाकिचा प्रकार असावा. असा इत्यर्थ ठरला.

सन १८८८ ह्मणजे चालू सालीं एकंदर ९ ग्रहणे आहेत.

सातारा वाळवें तालुक्यांतील एका गुरवानें आपली बायको व्यभिचारी निघाली ह्मणून तिजवर फौजदारींत फिर्याद केली. पण चौकशींत ती साध्वी ठरली! तेव्हा नवऱ्याला खोट्या फिर्यादी बद्दल पांच वर्षांची कैद होऊन खेरीज घरदार विकून पोटाबद्दल बायकोची धन करावी लागली.

विजेची गाडी — बाइटन इलेक्ट्रिक रेल्वेचे मि. मागनस व्होल्फ यांनीं एक विजेची गाडी तयार केली आहे. तिचा वेग फरसबंदी सडकीवरून दर तासास ९ मैल प्रमाणें आहे आणि इतर रस्त्यावर दर तासास ४ मैल प्रमाणें आहे.

— शास्त्रीय प्रयोगालय ( लाबोरेटरी ) अमेरिकेंतील प्रसिद्ध शास्त्र पंडित मि० इडिसन हे आपल्यासाठीं एक शास्त्रीय प्रयोगालय बांधणार आहेत. या इमारतीच्या मुख्य दिवाणखाण्याची लांबी २५० व रुंदी ५० फूट भरणार आहेत. या शिवाय दुसरे ४ छोटे दिवाण खाने करावयाचे आहेत त्यांची प्रत्यकांची लांबी १०० फूट व रुंदी २५ फूट व्हावयाची आहे. या इमारतीतून सर्व प्रकारची यंत्रें कीं ज्यांच्या साह्यानें खिशांतील घड्याळा पासून तो वाफेच्या थोरल्या यंत्रापर्यंत यंत्रें करितां यावी, यांचा संग्रह ठेवणार आहेत. या शिवाय जगतांत उत्पन्न होणार सर्व खनिज उद्भिज वगैरे पदार्थांचे नमुने आणविणार आहेत. या कृत्यास ४००००० रुपये लागतील असा अजमास आहे.

डोंगर समुद्राच्या भेटीस चालला— ग्रीस देशांतील एजियन व पाट्रास ह्या दोन शहरा मध्यें एक डोंगराची ओळ असून तिच्या उतरणीवरून आगगाडीचा रस्ता गेलेला आहे. सदर्हु डोंगर ता० १ फेब्रुवारी पासून आपली जागा सोडून हळू हळू समुद्राकडे जात चालला आहे. ह्या विलक्षण प्रकाराचा शोध करण्यासाठीं इंजिनर लोक पाठविण्यांत आले आहेत. अशी तार डेलीन्युझ पत्रांत प्रसिद्ध झाली.

यंदाच्या फेब्रुवारीचे २९ दिवस असतां यांत ५ बुधवार आले आतां असा पांच बुधवारांचा फेबरवारी महिना इ. स. १९२८ या वर्षापर्यंत येणार नाहीं.

अमेरिकेंत ( युनायटेड स्टेटसमध्यें ) टेक्सस मिनसेटा, डाकोटो, मोंटाना, नेब्रास्का, आणि कन्सास ह्या संस्थानांत जसा थंडीचा कडाका पडला तसा कडाका, ती संस्थानें बसल्यापासून कधी ही पडला नव्हता असें ह्मणतात; आणि न्यूयार्क ही त्या संस्थानांतील नद्या अगदीं गोठून त्यावर एक फूट जाडीचें बर्फ झालेलें तर कोणासच आठवत नाहीं असें सांगतात! हवेमध्यें गारठा इतका होता कीं पाणी गोठण्याचे बिंदु खालीं ३० अंशावर पारा उष्ण मापक यंत्रामध्यें उतरला होता! चोहोंकडे दाट धुकें पडून जिकडे तिकडे अतिशय जोराची बर्फ वृष्टी होत होती. शेकडों लोक ह्या बर्फवृष्टीमध्यें सांपडून गारठून गेले, सुमारें २ अंशावर मनुष्य मेल्याचे तर प्रसिद्ध झाले आहेच. शिवाय शेकडों लोक अझून सांपडले नाहींत! मोठमोठ्या बर्फाच्या ढिगाऱ्यां खालीं स्त्रिया पुरुष, आणि मुलें सांपडून त्यांचें प्राण गुदमरून ती मरून पडलीं! लोकांना सर्पणावांचून फार हाल काढावे लागले सर्पण आणण्यास बाहेर पडवत नाहीं, आणि थंडीचा तर कडाका असा, ह्या मुळें घरांत देखील लोक थंडीनें काकडून मेले. भुयारें दशादिशा इतक्या कोंडून गेल्या होत्या कीं सहा फुटावरूनच मनुष्यांचा आवाज ऐकूं येत नव्हता, आणि चार फुटावरील पदार्थ दिसत नव्हता! चोहोंकडून हिवानें, थंडीनें व बर्फानें लोक मेल्याच्या खबरा येत आहेत! हिवाळ्यानें आपले हे असें परमावधीचें भयंकर स्वरूप तिकडे ह्या पूर्वी कधीं ही दाखविलें नव्हते असें न्युयार्क येथून आलेल्या तारेवरून कळतें.

बंदरांचा पक्का धंदोबस्त करण्यास तीस लक्ष पौंड जास्त खर्च करण्याची मंजुरी दिली आहे.

न्या. सिं.

रा. नाना नारायण भोर ह्मणून एक अंधळा विद्यार्थी यंदाच्या वकिलीचे परीक्षेस आला आहे, व त्याला प्रश्नाचीं उत्तरें लिहिण्या करितां एका कारकुनाची सोय लावून दिली आहे. हा विद्यार्थी १८८५ सालीं म्याट्रिक्युलेशन परीक्षा पास झाला होता. अधळ्याचा दाता राम ह्मणतात ते कांहीं खोटें नाहीं.

क०

☞ हें पत्र आकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

६ाामाही ॥ ३ ॥ ०८
साल अखेर ७ ॥ १ ०१८
किरकोळ अंकास ........................ ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळीच आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........ ०१

Per annum in arrears 7 „ 1R. 8 as
Six monthly ........... 3 „ 8 as
Single copy ........................ 4 as.

Advertisements.
Below 10 lines...2R
Per line over 10...4a.
epetition per line...2a


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.


VOL. XXII AKOLA MONDAY 19 MARCH 1888 NO. 11
वर्ष २२ अकोला सोमवार तारीख १९ माहे मार्च सन १८८८ इ० अंक ११



Auction.

Of tents, and miscellaneous articles, the property of Mr. N. R. Cumberlege, at his benglow on Sunday 25 th March at 7 A. M.

Vittuji Narayen
District Nazar
Akola.

Akola 9-3-88

## लिलाव.

रविवार तारीख २५ मार्च सन १८८८ रोजीं प्रातःकाळचे सात वाजतां मे० एन्. आर कंबरलेज साहेब यांचे बंगल्यावर त्यांचे खासगी तंबु व इतर फिरकोळ सामान यांचा लिलाव होणार आहे.

आकोला ९-३-८८ इ०

विठूजीनारायण.
डिस्ट्रिक्टनाझर.
आकोला.

## जाहिरात

टपाल खर्च ०४ आणे

### वनौषधी सार्षा प्रमाणें.

किंमत एक बाटलीस १॥ रुपया
औषधी सोबत कागद व चमचा.

फक्त एकाच औषधीपासून खालीं लिहिलेले सर्व प्रकारचे रोग दूर होतात, व त्या संबंधानें झालेला पत्रव्यवहार व सर्टिफिकिटें स्थळां विस्तार न दतां रोग्यांचीं नांवें मात्र दिलीं आहेत. उपदंशाचा व्य, गरमीचे अनेक प्रकारचे रोग, वातु, खर त्रिदोष धुपणी लागते तो रक्त दूषीत झाल्यापासून हातां पायांवर डाग पडणें, सर्व स्वचेचे रोग कच्चा पारा सेवन केल्यानें सूज येणें, कळा लागणें व सर्व प्रकारचा संधी वायु, गंडमाळा, पित्त, जळवात, कडकी अन्हळित, पोटशूळ, पोटफुगी, नळवायु, मस्तकशूळ व सूत्ररोग जिर्णरोग घट, दातांतून पू येणें, रक्त येणें व तोंडाची दुर्गंधी आदिकरून सर्व रोग वरील औषधानें दूर होतात.

पत्ता-मुंबई फणसवाडींत बाळकृष्ण भिकाजी नाखवा यांचे चाळींत
डा. धाकजी भानजी सांवत.
Dr. D. B. sawant.
-12188307-


## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांसः—

वि० वि० आपल्या पत्रांतील क्ष. व रामराव अशीं दोन पत्रें प्रसिद्ध झालेलीं पाहून मी जागा जाहलों व त्यावरून सुद्धवऱ्हाडी पत्रांतील पूर्वींचे लेख वांचून पाहून एकंदरींत या सार्वजनिक कृत्याचा हा शेवट होतो. परंतु एडिटरराव दगड घातला भिजूं म्हा दोंही परी न भिजे कांहीं वरें त्याची. ह्या अभंगांतील आशयाप्रमाणें सर्व स्थिती झाली. रा. रा. गणपतराव रावसाहेब हे अखेरीस परत आलेत.

आमचे लोक बहुतकरून सुधारक हल्लींचे प्रसंगीं सुधारक हे सर्व प्रकारें आहेत. आरंभशुरा जी सभा श्री गणेश मंदिरांत रावबहादूर जठार माजी वकील नागासाहेब दिगंबर वगैरेचे अध्यक्षते खालीं झाली व त्याच सभेचे सध्याचे उग्दार व तिचें फैलाव देशास हितकारक आहे व आमचे तयें सुरू झालें आहे तसें येथें करा असा निश्चून आग्रह धरून व्याख्यान बाबासाहेब ( देवराव विनायक ) यांनीं येथें मोठ्या जोरानें दिलें व आपली व लोकांची देश सेवेची तत्परता जागृत करण्याचा यत्न केला. मी त्या सभेस होतो त्यावरून मजला असें वाटलें होतें कीं, ही गोष्ट आतां अगदीं खास निकरावर गेलेली आहे व आमचे देशांत आतां हा प्रकार निदान कांहीं निवडक मंडळींत तरी खास सुरू होईल. असें वाटलें होतें.

प्रथम दर्शनी माझी समजूत अशी झाली होती. कीं मुलाचें वय ८ वर्षांवर झाल्याशिवाय लग्न करूं नये. हा जो नियम ठरला हा चालण्यास कदाचित संसाराच्या गरीबाच्या, आपले लोकांत एकांतएक कार्य उरकून घेण्याच्या ज्या चाली आहेत त्यामुळें कित्येक वेळा हरकती येतील परंतु पुरुषांनीं चाळीस वर्षांनंतर वर झाल्यावर लग्न करूं नये हा जो नियम आहे तो मात्र बीन हरकत सुरळीत चालेल अशी माझी निर्धास्तपणें खात्री झाली होती परंतु माझे समजसपणांत 'कामातुराणांन न भयंन न लज्जा' हें ज्या ऋषींनीं व पोक्त विचारी मनुष्यांनीं वचन लिहिलें तें मजला मुळींच ठाऊक नव्हतें व माझें मत आपल्यास ज्यानीं तीं दोन पत्रें लिहिलीं त्यासही ठाऊक नसेल असें वाटतें.

अहो एडिटरराव तरी देखेल माझी चुकीच असेल कारण ह्या सभेत मोठ मोठाली मंडळी होती. त्यांना हें वाक्य ठाऊक नसेल असें माझ्यानें म्हणवत नाहीं. किंवा रा. रा. वैद्य यांना तरी हें ठाऊक नसेल असें म्हणणें म्हणजे त्यांचे विद्येचो अप्रतिष्ठा करणें होय असें मी समजतों.

कदाचित हल्लींची विद्या विभुषीत मंडळी यांस भूषण होतां त्यांनीं ह्या लोकांच शिताकडे पाहून दिवसेंदिवस लोक विमुख होत चालले यांजकडे लक्ष देऊन ४० वर्षांवर वय गेलें म्हणजे तो कामातूर होणार नाहीं असा ठराव केला असेल. व तो त्यांच्या कागदांत अगदीं पोक्त विचाराचा घातला गेला ह्यांत कांहीं संशय नाहीं.

राव साहेब वैद्य यांनीं आतां जो पुनर्विवाह केला तो नवीन मतास अनुसरून नव्हतां जुने व अडाणी असे लोकांचे मतास मिळून केला. हें त्यांचे कृत्यास सुधारक म्हणून वेडून कृतीं करून दाखविलो नाहीं यामुळें त्यांचे बोलण्यावर कोणी भरंवसा ठेऊं नये असें म्हणण्यास उघडपणें भीती वाटत नाहीं. व याबद्दल ते आतां बहुतकरून कोणी निंदा अथवा वंदा आम्हा स्वहिताचा धंदा. यांजकडे लक्ष देऊन स्वस्थ बसतील व बसणेंच भाग झालें आहे.

४० वर्षांचे पुरुषांचें वय होऊन गेलें म्हणजे तो बहुतकरून स्वतंत्र झालेला असतो त्याची बुद्धी विद्येचे योगानें व जगांतील अनुभवाचे योगानें पोक्त झालेली असते व त्यामुळें त्याजकडून पुढें अविचार होण्याची भीती राहत नाहीं. व त्याजला जगांतील अडचणी चांगल्या कळून येतात. ह्या सर्व गोष्टी रा. रा. वैद्य यांना समजल्या होत्या कारण त्यांचें वय ठराव होते वेळेसच अगदीं ४० चाळीसचे जवळ येऊन ठेपलेलें होतें. पुढें आपल्यास जगांत काय करणें याचा विचार त्या वेळेस जर त्यांना सुचला असतां तर त्यांची जगांतील आजपर्यंत जी सरळ व साधेपणाची वागणूक आहे. तिला बाध आणण्यासारखा अप्रबुद्धपणाचें वर्तन यांजकडून जाहलें नव्हतें.

हिंदु धर्म शास्त्रांत पाणिग्रहण करणें गत व्हावें हा उत्तम मार्ग वरिष्ठ आहे. व तोच स्त्री धन्य असें समजलें जातें. त्यास धरून अनुसरून रावसाहेबांनीं शास्त्र आज्ञा उल्लंघन न करतां विवाह केला. परंतु आतां त्यांना अगदीं मोठी मुलगी मिळाली असेल तरी तिचें वय बहुतकरून १२ वर्षांचे वयाबद्दल तरस्वीचें वय ४१ वर्षांचें. २९ वर्षांचें अंतर आहे ह्याची याहून लावण्याचें काम मला गणत येत नाही त्यामुळें एखादे गणाच्याकडें गोष्ट होतां त्यांनीं हें अंतर तुटण्याचा व्यवस्था लावून द्यावी.

आपले दोन्ही अंकांतील पत्रांत रावसाहेब वैद्य यांना उद्देश होता परंतु तो त्यांनी एकीकडे ठेविला असे.

वरील सुधारक मंडळींनीं आपले मार्फत रावसाहेब वैद्य यांजकडे डेप्युटेशन पाठविण्याचें होतें किंवा पुन्हा श्री गणेश मंदिरांत सभा भरवून त्यांत रावसाहेब यांना बोलावून आणून त्याजकडून हे हाक तितका यत्न करून सांगण्याचें होतें परंतु रावसाहेब वैद्य यांचे मर्जी विरुद्ध ही गोष्ट होतें एतद्या करितां जिकडे तिकडे गवगवा ही मंडळी करतील हें त्यांनीं चांगलें केलें नाहीं. मला वाटतें प्रथम रावबहादूर जठारांसारखी मंडळी जर पुढें होती आणि त्यास मंडळींनीं जर ह्यांना सामोपचारानें किंवा अखेर खरमरीत समजूत घातली असती तर वैद्य यांनीं अविचाराचा दुराग्रह धरला नसता ह्यांत कांहीं संशयच नाहीं.

रावसाहेब वैद्य यांचा लग्न करण्याचा तरी दुराग्रह फक्त मुलांचें सुख पाहण्यास मिळावें इतक्याच उद्देशानें केलेलें आहे. बाकी सर्व गोष्टी त्यांना ईश्वरकृपेनें आज अनुकूल आहेतच. आतां त्या सुखाचा अनुभव रावसाहेब वैद्य यांना डोळे भरून मिळो असें इच्छितों.

सुधारक मंडळींनीं मात्र आपलें सभेची काय व्यवस्था लावणें असेल आतां लवकर लावावी. नाहींतर दुसरें कांहीं उपस्थित झालें म्हणजे आपलें हातांत कांहीं नाहीं म्हणून स्वस्थ बसण्याचा प्रसंग येऊं नये. लोभ करावा हे विनंती.

आपला.
दुरडाणेकर
कल्याण

( मिळून आलेला मजकूर )

## आर्य वैद्य शास्त्र
## अवश्यकता

आपण पृथ्वीवरील कोणत्याही देशांत पाहिलें तरी वैद्य शास्त्र हें मुख्य गणलें आहे ह्याचें कारण उघडच आहे कीं तें कोणत्याही देशांत अवगत असल्यावांचून गत्यंतरच नाहीं. प्रत्येक मनुष्याच्या आरोग्यास व हुन्नरास ते कारणीभूत आहे. सर्व प्रकारच्या सुधारणा त्याच्या अंगभूत आहेत असें म्हणण्यास कोणत्याही प्रकारची अडचण दिसत नाहीं. कारण देशांत आरोग्य व स्वस्थता हीच सुधारणेचे विचार मनांत प्रवृत्त करितात व आरोग्य कायम राखण्यास वैद्य शास्त्रावांचून अधिक बलवत्तर साधन दुसरें कोणतेंच नाहीं.

वैद्य शास्त्र उच्च पदीस नेऊन पोहोंचवावें अशाविषयीं प्रत्येक राष्ट्र खटपट करीत आहे, व कित्येकांना त्यांच्या श्रमाचें पूर्ण फळही आलें आहे. परंतु आमच्या ह्या हतभाग्य हिंदुस्थान देशाची स्थिती किती भिन्न आहे बरें? कांहीं काळामागें जो हा देश ह्या कलेंत —दुसऱ्या सर्व कलांप्रमाणें—पूर्णत्व दशेस येऊन पोहोंचला होता, त्याचे ह्या देशास दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावयास लागणें भाग पडणें ह्यासारखी शोचनीय स्थिती कोणतीच नसेल. 'वैद्य शास्त्र आवश्यकता' हा विषय वादग्रस्त मुळींच नाहीं. पुनर्विवाह बालविवाह इ. विषयाप्रमाणें या विषया संबंधानें कोणाचेंही मतभेद नाहींत, असें असून आमच्या लोकांची जी स्थिती होती त्याचें पुनरुज्जीवन करण्यास ध्येय मुद्दां ह्यगय फारच अहितकारक होय.

रा. रा. बापुसाहेब मेहेंदळे ह्यांच्या मृत्यू पासून पुणें शहरांत ह्या विषयासंबंधानें बरोच

खळबळ उत्पन्न झाली आहे व आर्य वैद्य शास्त्राचें पुनरुज्जीवन एखादी वैद्य पाठशाळा स्थापून करावें असा विचार त्या लोकांत चालूं आहे. आमच्या वऱ्हाडांत वैद्यांची उणीव इतकी आहे कीं तितकी उणीव दुसऱ्या कोणत्याही प्रांतांत नसेल. असें असून आह्मी लोकांनीं ह्या गोष्टीचा कधींच विचार केला नाहीं ही मोठी आश्चर्याची गोष्ट होय. प्रत्येक मनुष्याला जेव्हां त्याच्या घरीं कोणी आजारी असेल तेव्हां ह्या गोष्टीची उणीव स्पष्टपणें कळून येत असेल सर्वां मनुष्यांना ज्या गोष्टीची नेहमीं अडचण त्या गोष्टीचा कांहीं विचार न करणें ही मोठीच लांछनास्पद गोष्ट झाली पाहिजे. आतां साधारण लोकांस ह्या संबंधानें दोष देणें रास्त होणार नाहीं कारण त्या लोकांचे मनांत असले विचार आले तरी त्यांस आपली इच्छा परीपूर्ण करण्यास साधनें फारच कमती असतात. त्यांस सर्व प्रकारें पुढारी व श्रीमान लोकांवर अवलंबून रहाणें भाग पडते. बरें आमच्या पुढारी व श्रीमंत लोकांस ह्या विषया संबंधानें विचार करावाच लागत नाहीं कारण त्यांस द्रव्य बलाच्या योगानें पुणें अगर मुंबई इत्यादि ठिकाणीं गरज पडल्यास जाण्यास सर्व साधनें आहेत. तेव्हां ते गरीब लोकांकरितां श्रम करितील ही आशा बाळगणें व्यर्थच. तरी त्या लोकांस सूचना करणें हें आमचें कर्तव्य आहे, आणि त्या लोकांवर प्रांताची पुष्कळ तऱ्हेनें जबाबदारी असल्या कारणानें ते ह्या संबंधानें कांहीं तरी विचार करतील अशी आशा करणें हें पुष्कळ रीतीनें योग्य होईल.

आह्मांस आतां नवीन व होतकरू विद्यार्थी तयार करून शिकवून आणल्यावांचून दुसरा उपायच नाहीं. करितां एक मोठा फंड उभारून पुण्यांतील भावी वैद्य पाठशाळेंत (जर ती स्थापन झाली तर) अथवा दुसऱ्या एखाद्या चांगल्या ठिकाणां आमचे विद्यार्थी पाठवून त्यांची विद्या पूर्ण झाल्यावर त्यांस इकडे वैद्यकीचा धंदा करावयास लावावें, ह्यापासून इच्छित हेतु सहजच पूर्ण होणार आहे. आमचे लोक अपरोक्ष फायद्यास देखील हजारों रुपये खर्च करितात तर वैद्यकासारख्या प्रत्यक्ष फायद्यास पैसा खर्च करण्यास ते कधींही मागें पुढें पहाणार नाहींत. आमची सार्वजनीक सभा व पुढारी लोक यांनीं ही गोष्ट मनांवर घेतली पाहिजे. आमची सर्वांस इतकीच विनंती आहे कीं, कोणी तरी हा विषय हातांत घेऊन लोकांस एका मोठ्या अडचणींतून काढल्याचें श्रेय घ्यावें एवढेंच आमचें त्यांस सांगणें आहे.

# वऱ्हाडसमाचार.

मिती अधिकचैत्र शुद्ध ६ शके १८०९

## पब्लिक सर्व्हिस कमिशनचा रिपोर्ट.

नाना प्रकारच्या गप्पा बाहेर येतां येतां सरतें शेवटीं लार्ड डफरीन साहेबांनीं पब्लिक सर्व्हिस कमिशनचा रिपोर्ट एकदांचा पार्लमेंट पुढें ठेवला. यांत दुसरी आनंदाची गोष्ट ही कीं त्याची हकीगत आम्हां हिंदुस्थानवासी जनानां तारायंत्रांतून सारांष रुपानें कळावी किंवा महिना पंधरा दिवसांनीं मागाहून समजावी तसें न होतां इग्लंडांत प्रसिद्ध झाली त्याच दिवशीं कलकत्यांत ही प्रसिद्ध झाली या रिपोर्टाचे दोन भाग आहेत पहिल्यांत खुद्द रिपोर्ट आहे व दुसऱ्यांत परिशिष्टें जोडिलीं आहेत. हा रिपोर्ट हिंदुस्थान व इंग्लंड या दोनही देशांतील राजकारस्थानीं पुरुषांना अति महत्वाचा व फार उपयोगी पडणार आहे कारण यांत आपले राज्यकर्ते व आपण एतद्देशीय लोक त्यांची प्रजा यामध्यें कोणता संबंध असावा व परस्परांचे हक्क कशा मानानें असावेत याचें विवेचन चांगल्या विस्तारानें व गूढ विचारानें केलेलें आहे. या कमिशना समोर एकंदर ८४९ साक्षीदारांच्या साक्षी घेतल्या आहेत व त्याच प्रमाणें दुसऱ्या ११३ गृहस्थांकडून आलेल्या लेखांचा व सुचनांचा विचार केला आहे. तेव्हां याचें महत्व किती आहे हे सांगणें नकोच.

या कमिशनाची स्थापना झाली तेव्हांच कित्येक आंग्लो इंडियनांनीं त्या विरुद्ध बराच कावकाव केला. व बहुतेकांनीं आपल्या साक्षी देतांना एतद्देशीय लोक बुद्धिवान व विद्वान आहेत ही गोष्ट जरी कबूल केली तरी मोठाल्या महत्वाच्या व जबाबदाराच्या कामावर त्यांना नेमण्याजोगीं निस्पृहता, निःपक्षपातीपणा, व मनाची स्थीरता त्यांच्या आंगीं नाहींत, असें बोलून दाखविलें होतें. यावरून कमिशनांत नेमलेल्या गृहस्थांचीं मनें त्यांच्या म्हणण्याकडे ओढलीं जातील असें भय पडलें होतें परंतु सर चार्लस आचीसन, व सर चार्लस टर्नर सारखे सत्यप्रिय व निःपक्षपाती गृहस्थ त्या कामांत प्रमुख असल्या कारणानें हें भय पुष्कळ अंशीं खोटें ठरलें आहे कमिशननें आपल्या शिफारशींत असल्या जागा एतद्देशीयांस देण्याचें काम निरनिराळ्या खात्याचे मुख्य कामगार यांजकडे सोंपविलें आहे व त्यांनीं या कामीं निवड करितांना केवळ निःपक्षपातानें सर्वांचे हक्क पहावें असें सुचविलें आहे. आतां ह्या अधिकाराचा उपभोग कदाचित ते आपल्या मता प्रमाणें करितील परंतु कमिशननें केलेल्या शिफारशीच्या केवळ विरुद्ध वागण्याचें त्यांना खरोखर कठीण पडेल.

साक्षीदारां पैकीं खुद्द एतद्देशीय व एतद्देशीयांच्या तर्फेचे युरोपियन यांच्या पुराव्या मध्यें मुख्य गोष्टी या होत्या, (१) सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेच्या वयाची इयत्ता २३ वर्षांची करावी, (२) संस्कृत व अरबी या भाषांना परिक्षेंत जे मार्क हल्लीं मिळत आहेत त्यापेक्षां अधिक द्यावेत, (३) इंग्लंड व हिंदुस्थान या देशांत बरोबर २ परीक्षा एकदम व्हाव्या, (४) बिनसनदी नोकरांच्या जागांपैकीं मोठ्या हुद्यांच्या जागा एतद्देशीय लोकांस हल्लीं मिळत आहेत त्यापेक्षां अधिक मिळाव्या. या चार ही सुचनांपैकीं १ खेरीज करून बाकींच्या सूचना कमिशनला पसंत पडल्या आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. हल्लीं सिव्हिलसर्व्हिसची परीक्षा फक्त इंग्लंडांत होते तशी हिंदुस्थानवासी जनांपैकीं ज्यांना धर्मसंबंधाच्या अडचणीमुळें इंग्लंडांत जातां येत नाहीं त्यासाठीं हिंदुस्थानांत ही व्हावी अशी जी सुचना होती ती कमिशनास पसंत पडली नाहीं. वास्तविक पहातां ही सूचना रास्त होती. धर्मसंबंधानें अडचणी व वयाची इयत्ता तारीं १९ वर्षें या दोन कारणामुळें आमच्या देशांतील लोकांस आपलीं मुलें हुशार व योग्य असतां ही दुरदेशीं पाठविण्यास फार भय वाटेत. पण हिंद परीक्षा हिंदुस्थानांत होती तर ही अडचण दूर होऊन सर्वांना सारखा फायदा मिळता. कमिशननें ही गोष्ट ना पसंत केली. त्याच्या मता प्रमाणें सनदी नोकराच्या अंगीं जे गुण अवगत पाहिजेत ते इंग्लंडांत जाऊन तथील लोकांनीं कांहीं दिवस सहवास केल्या शिवाय व तेथील सुधारणेचा कांहीं संस्कार लागल्याशिवाय एतद्देशीय लोकांच्या अंगीं यावयाचे नाहींत. हें मत कितपत खरें आहे हें पुढें एखादे वेळेस पाहूं.

वयाची इयत्ता १९ पासून २३ पर्यंत केली आहे ती सर्वांना पसंत पडण्याजोगी आहे.

एतद्देशीय भाषांविषयीं कमिशनर लोकांचे अभिप्राय अनुकूल नाहींत आणि त्यांत आपल्याला वाईट वाटण्यासही नकोच कारण देशांतल्या देशांत आपल्या युनिव्हर्सिट्या जर एतद्देशीय भाषांविषयीं इतकी अनास्था दाखवीत आहेत तर परदेशीय लोकांस दोष कां द्यावा?

कमिशननें मोठाल्या हुद्याच्या जागांचे २ विभाग केले आहेत. एक "इंपिरियल सर्व्हीस" व दुसरी "प्राव्हिशियल सर्व्हिस." "इंपिरियल" सर्व्हिसमध्यें राज्यांतील राज्य कारभारा संबंधीं ज्या मुख्य जागा आहेत त्या सर्व येतील व शिवाय नवीन आलेल्या सिव्हिलियन लोकांना कामाचें ज्ञान होण्याकरितां त्यांत हलक्या दरजाच्याही कांहीं जागा येतील. ह्या जागा हल्लीं सनदी नोकरांच्या ज्या जागा आहेत त्याप्रमाणेंच बहुतेक अंशीं आहेत फक्त त्यांतील कांहीं जागा ज्या हल्लीं फक्त सनदी नोकरांनाच मिळत आहेत, त्या "प्राव्हिनशियल" किंवा बिनसनदी नोकरांना दिल्या जातील. या जागा देतांना हिंदुस्थानांतील सर्व जातीच्या लोकांच्या प्रमाणाकडे सारखें लक्ष दिलें जाईल. "इंपिरियल सर्व्हिस" मधील कामगारांना राज्यांतील पाहिजे त्या हुद्यावर पाठवितां येईल, पण "प्राव्हिनशियल सार्व्हिस" मधील कामगारांना फक्त त्या त्या प्रांतांत किंवा इलाख्यातच काम केलें पाहिजे. ज्या जागावर हल्लीं फक्त सनदी नोकरांचेच हक्क आहेत अशा १०८ जागा बिनसनदी नोकरांपैकीं हुशार कामगारांना देण्याबद्दल सूचना आहे. यापैकीं पुष्कळ जागा महत्वाच्या आहेत.

लार्ड लिटन साहेबांनीं देशांतल्या खानदानीच्या लोकांपैकीं विद्वान हुशार अशा लोकांस सनदी नोकर करण्याचा जो कायदा प्रचारांत आणिला होता तो बहुतेकांना नापसंत झाला आहे. तथापि कमिशननें तो अगदींच रद्द करून टाकिला नाहीं. स्टेटयुटरी सिव्हिलियन नेमण्याच्या कायद्यामध्यें कांहीं फरक करावा व त्या कायद्याप्रमाणें अगदीं अपवादक व फारच थोड्या प्रसंगीं मोठाल्या घराण्यांतील वास्तविक हुशार हुशार लोकांस सनदी नोकर नेमावे अशा कमिशनाची शिफारस आहे.

या प्रमाणें कमिशनच्या मुख्य मुख्य शिफारसी आहेत या शिफारसी योग्य किंवा अयोग्य ठरविणें हें काम आतां इंग्लंडांतील अधिकाऱ्यांच्या हातांत आहे. तो निकाल आमच्या सुदैवानें किंवा दुर्दैवानें कसाही होवो. सध्यां आमच्या मनांत आशेचे अंकूर फुटण्याला कारण मिळालें आहे खर. कमिशननें ज्या सूचना केल्या आहेत त्यांपैकीं बहुतेक रास्त असून आमच्या लोकांच्या सांप्रतच्या अवस्थेला योग्य आहेत. कामिशननें स्थानिक सरकारांच्या हातांत जी सत्ता दिली आहे तिचा उपयोग त्यांनीं जर न्यायानें व निःपक्षपातानें केला तर आम्हाला कुरकुर करण्याला कांहीं कारण होणार नाहीं.

कमिशननें आपलें काम न्यायानें व योग्य रीतीनें केलें या बद्दल सरकार व प्रजा सरचार्लस टर्नर व त्यांचे सहकारी यांचे फार ऋणी आहेत आम्ही स्वतः त्यांनीं आपलें काम उत्तम रीतीनें बजाविलें या बद्दल त्यांचें मनापासून आभार मानतों व हा लेख सध्यां येथेंच संपवितों.

श्रीमंत गायकवाड सरकारनीं प्रत्येक वर्षीं इंग्लंड, अमेरिका व जर्मनी येथें दोन दोन विद्यार्थी कलाकौशल्य शिकण्याकरितां पाठविण्याचा बेत केला आहे असें समजतें. पहिल्या वर्षीचे उमेदवार लवकरच प्रो. गज्जर ह्यांच्या देखरेखीखालीं जावयास निघणार आहेत. ही गोष्ट खरोखरीच अभिनंदनीय होय. आमचे राजेरजवाडे जेव्हां अशीच कांहीं चळवळ करतील तेव्हांच आमच्या देशाचा भाग्योदय झाला तर होईल. आमच्या राजेरजवाड्यांनीं परदेशांत प्रवास करावयाचा त्याचा उद्देश निवळ हौस अथवा चैन ह्या करितां नव्हे आहे तर त्यांनीं परदेशांत जाऊन आपल्या देशास उपयोगी पडतील अशा गोष्टीस हस्तें परहस्तें उत्तेजन देणें हा होय. श्रीमंत गायकवाड सरकारांचा कित्ता दुसरे राजे रजवाडे जर गिरवतील तर काय होणार नाहीं आमच्या सुधारणेस अथवा उत्कर्षास आमच्या राजे लोकांची मदत आम्हास अगोदर पाहिजे आहे आणि ती जर पूर्णपणें मिळेल तर आमच्या दैन्यावस्थेस लवकरच आपलें तोंड काळें करावें लागेल.

# The Berar Sumachar

MONDAY MARCH 19, 1888

## THE PATRIKA ON SIR LEPEL GRIFFIN.

Thanks to the out spokenness of the Amrit Bazar Patrika the high handed and arbitrary proceedings of Sir Lepel Griffin in Bhopal are exposed. So long we doubted the genuineness of the letters the Patrika is in possession of, but now we feel sure that the letters are genuine since the expositions are not contradicted and the Government does not permit Sir Lepel Griffin to prosecute the Patrika for the scandalous charges that are brought against him. It is already known of what stamp is Sir Lepel Griffin from the speech delivered at Indore, wherein he betrayed his foolishness in advising the people of India to hold fast to the rules of caste and encouraging party spirit and jealousy among the different races that inhabit India. The Amrit Bazar Patrika is now exposing his high hand-

edness in the administration of the Rewah State. Here, as in Bhopal, the Patrika says, he has not refrained from exhibiting his intriguing nature. If the kharitas of which the Patrika is in possession, are genuine and we have no doubt that they must be, the proceedings of this political agent are of the most unworthy character. Surely he is what they call a Machiavellian politician. Not only has he not personally heard the grievances of the Maharanee but he so managed things that the kharitas addressed to the viceroy should not reach him at all.

He has made attempts to represent the aggrieved party to be a lunatic. The Patrika says that the letter detailing the grievances of the Maharanee and addressed to the Viceroy is returned to her with the usual oral explanation that the orders of the political agent are final, exactly as would be expected in these cases. The oral explanation is the only trick to get out of scrape, if he gets into it at any future time. Most pitiable is the state of these princes who are not allowed those privileges and natural rights of man, which the meanest subject in England enjoys; rights of personal protection, representing grievances, and demanding fair justice. How far this policy is creditable to the Government, which brasts of freedom of action, liberty, and perfect justice, it is the duty of the persons who are in charge of it to see. If this flagrant injustice is connuied at, they would do much harm to themselves and the Government which is in their hands. The Maharanee bitterly complains that she and her son are mal-treated that proper respect and reception due to her rank, are purposely not shown, that her son is snatched away from her, that his health is bad his education is neglected.

She adds that the treasury is now empty and expenditure is increased and the contracts entered into between the state and the British Governments are not kept up. We do not wish to go through all the details of the grievances of the Maharanee, but from their nature the management of the administration, we can safely say, is not very satisfactory. We hope the Viceroy would soon remove the cause of complaint. We agree with some of the English papers, when they say that Sir Lepel Griffin must be brought home at once from India, as he is raising a cry which might do their country harm.

---

A secret police circular was recently issued from the Bengal Inspector general of Police which has surprised and agitated the whole Bengal native press. The circular in question requires the sub-inspectors in charge of stations to submit weekly to the District Superintendent a confidential report on the subjects mentioned below, and that they are to obtain information from all available sources, the authority being mentioned wherever possible. The list of subjects to be reported on is:—

(a) all political movements, sects, publications and the like.

[b] Information regarding religious sects, changes in doctrine and practice, having a political significance, propagaudism.

[c] The arrival, sojourn, departure and proceedings generally of suspicious characters and foreigners special attention being paid to possible foreign emissaries, and the movements of wandering gangs of criminals, the presence in any place of noted criminals and any circumstances regarding their habits that may come to notice.

(d) Rumours or published opinions disturbing the public peace; popular feelings and rumours.

(e) Religious excitements; comments on laws and Government measures.

(f) Illicit trade in arms and ammunition with special reference to any prosecution under the Arms Act of smuggling and to any discoveries of concealed arms.

(g) Affairs in independent or semi-independent Native States and rumours regarding them.

Constitution, objects, and proceedings of Native Societies, whether estoblished for political or ostensibly for other objects.

(i) Political or mass meetings, their origin, organization, and result as to public feeling in the neighbourhood, selected with especial reference to any tendency towards, or probabiliting of agrarian excitement.

(j) Recruiting for the Indian army or for Native States.

When we take into consideration the policy so long followed by the English Government we should not at all be surprised at the circular in question. The circular is not the first of its kind and does not deserve to be taken so much notice of? If espionage is practised in Ireland and England much more should it be here. The practise is continued in many places, but the consequence of this practise in India where people are harmless, submissive and loyal, would be mischievous. What strikes us with circular the words contained therein 'the authority being mentioned wherever possible,' and 'aptitude this kind of work will recommend them for advancement. We all know how often poor innocent people are victorious of punishment on account of the miserable subter fuges of the police and how often cases are got up where there is not the best room for suspicion. And when officers know that they can make use of even the authority in getting information and that their promotion depends upon the accumulation of information, no matter how it is obtained, they would be inclined to do all kinds of mischief.

---

Our local contemporary the Vaidarbha in writing on village Sanitation in its issue of the 25th ultimo, has done ample justice to the subject which as is said, is really of vital importance to human life. The means proposed for adoption are also practically useful with slight alterations, under the present state of things. But we are at a loss to understand why Rests Book circular in which the village Conservancy Rules have been embodied and promulgated for enforcement in the Province general ly was lost sight of notice of it was taken in the treatment of the subject. It would have afforded an insight into the existing state of village conservancy arrangement that is obtaining in the Province and opened a way to suggest such further means as are requisite. As it is it is sufficient to know that an attempt is made to draw the attention of Government to the subject and we hope that the good wishers will not be disappointed in their expectations to see something done early in the way of improving the village Sanitation. It would also no doubt be interesting to know whether at all and what the Sanitary Commissioner has done or has been doing in the matter. It has been found by and even remarked upon by Sanitary Commissioner that the Residents Book circular above referred to, is loosed upon by the village officials as were waste paper. Has Doctor Little, one would like to know taken any action to have the rules enforced? We should hope he has and the public may not therefore accuse him of inattention to his chief duty for which he receives a handsome salary

The system of Municipalities has no doubt worked splendidly so long and the improvements that are wrought the under are also of great Public utility. But the fact must not be ignored that it was the Sanitary Commissioner who with his repeated useful suggestions awoke the Municipalities and particular ly the one of Akola to show what has been seen here since the past few years. The Vice President Mr. DeoRao Vinayak and some of the members have also lent their hearty cooperation at the sacrifice of their valuable time and gains. The outcome of all this has been that the small city of Akola and its suburbs have become quite a new place to an observer who has not seen it for some time past. With all this however, it is very strange to observe, the Municipality is not said to be popular. We do not understand why it should not be so. It is true that that the duties which the Vice President is called upon to perform are of such a nature that he can not always please everybody with whom work brings him in contract And at the same time it should be remembered that if the power that is vested in him is exercised with due discretion and strict impartiality there will be perfect freedom for him from the accusation of being unpular. To please one friendly individual at the risk of displeasing several others forming a whole locality is decidedly not a safe policy. Such an act simply creates distrust amongst those whom the body represents. These have of late similar and other kind of complaints. which if true will never end in beneficial and happy results some of the local points which were recently placed before the board for consideration have been determined and decisions given upon which are said to be questionable and even unjust. It is even said to be doubtful whether facts are properly represented to the chairman whose strict sense of justice has raised him so high above others on the board. We hope that this gentle man will be pleased to hold an enquiry into the matters and check the growing discontment prevailing amongst the tax payers.

---

Mr. Howell arrived at Hyderabad on Wednesday afternoon and was received by the Minister and a large gathering of officials. Mr. Cordery left by yesterday's steamer.

---

## वऱ्हाड

हवामानः— हवा उष्ण आहे रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं.

पूर्वी मि० जॉन्स साहेब कमिशनर असतांना त्यांनीं, इंग्रजी आणि मराठी आफिसांतील लोकांस परस्परांच्या आफिसांत बदल्या मिळूं नये, ह्मणुन सरक्युलर केलें होतें व तें आजपर्यंत अमलांत आहे ह्या सरक्युलरांतील नियमापासून चांगलासा उपयोग होत नाहीं करितां तें रद्द करावें किंवा कसें ह्मणून मे० कमिशनर साहेब यांनीं सर्व डे. क. चा अभिप्राय विचारिला आहे. आमच्या मतें सरक्युलर रद्द करणें योग्य व जरूर आहे.

उमरावतीस उच्च जातीच्या मुलींची शाळा स्थापन करण्याचा विचार चालू आहे. हा विचार नागपुरचे लॉर्ड बिशप यांनीं काढिला असें ह्मणतात. मे० कर्नल बुरूक सा० यास पेट्रन व रा. रा. पुरुषोत्तमराव व्हाइस पेट्रन नेमिले आहे.

रा. रा. वासुदेवराव भिसोळकर यांस तीन महिन्याची रजा मिळाली व त्यांचे जागीं कमिशनर आफिसांतील क्लार्क रामराव पतकी यांस नेमिलें.

येथील एक्झीक्युटीव्ह इंजिनियर मि० लब साहेब यानवर एक सरकारी शिपाई समन्स लागूं करण्यास गेला असतां त्यास सदर्हु साहेबांनीं मारहाण केली. शिपायानें फिर्याद व तो खटला हल्लीं मि० आर्नर्ड सा० स्पे० अ० क० यांचे कोर्टांत चालू आहे.

मि. ए. पी. हावेल, एम्. ए. सी. स. हे आपल्या पत्नीसह हैद्राबादेस गेले व रेसिडेंटचे कामाचा चार्ज घेतला.

मि० कार्डेरी साहेब हे रजेवर गेले आठवड्यांत गेले.

---

मागाहून आलेल्या नोटिसा.

राजश्री जाउताई नवजे चिंतो परशराम परचुरे वस्ती कजबे आकोलें. यांसः—

खालीं सही करणार यांजकडून.

नोटीस देण्यांत येते कीं, कजबे आकोलें येथील आमचे हवेलीचे उत्तरेचे बाजूकडील गाडीखान्याची जागा तुमचें घर रस्त्यावर नसल्या कारणानें तुमचे यजमान चिंतोपंत यांणीं घोडे वगैरे बांधण्या करितां अशा शर्तीनें घेतली होती कीं जों पावेतों आम्ही येथें राहूं तों पावेतों जाग्याचा उपभोग घेऊ. जाते वेळेस तुमची जागा परत देऊं; त्या प्रमाणें तुमचेकडे जागा होतीच हल्लीं असें समजण्यांत आलें आहे कीं, तुम्ही आपली पालख्यावाली विकत घेतलेली जागा ते तुम्ही कृष्णाजी दिनकर याजला फरोक्त केली करितां नोटीशीनें कळवितों कीं, आमचा करार पुरा जाला. आतां ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत आमची जागा आम्हास परत द्यावी, असें न झाल्यास दिवाणींत दावा करून खर्चा सुद्धां जागा परत घेण्याची तजवीज केली जाईल. आणि ती तुम्ही फरोक्त केल्या प्रमाणें जागा कृष्णाजी दिनकर यांचे ताब्यांत घेऊन दुसरें ठिकाणीं जाऊन राहिले, आहां. तुमचा आमचा करार पुरा होऊन कांहीं राहिलें नाहीं ह्मणून सदरहु नोटीशीनें तुम्हास कळविलें आहे. कळावें तारीख १९ माहे मार्च सन १८८८ इ.

(सही.) गणेश लक्ष्मण अधीकरी
वस्ती आकोलें.
दस्तुर खुद्द.

---

नोटीस.

गंगाभागिर्थी मणकर्णिका बाई देशपांडे बाळापूर यांसी

भिमाबाई भ्रतार रामराव देशपांडे बाळापूर यांजकडून.

नोटीशीनें असें कळविण्यांत येते कीं, तुम्ही तारिख १०—३—८८ इसवीचे वैदर्भाचे अंकांत नोटीस दिली त्याचें उत्तर खालीं लिहिल्या प्रमाणेंः—

आमचे नांवची नोटीस देण्यास तुह्मास कोणतेच प्रकारें अधिकार नाहीं. रुक्कम सरकारांतून घेण्याचा अधिकार आमचा मुलगा नारायण रामचंद्र यांचा आहे. त्याजला तुम्ही पाहिजे तर नोटीस द्यावी ह्मणजे तो जबाब देईल. तारीख १६—३—८८ इसवी.

(सही.) व्यंकटराव मल्हार कु
मुखत्यार दस्तुरखुद्द

---

## वर्तमानसार

रत्नागिरी जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना ऋण-मुक्त करण्याच्या खटपटीसाठीं मुंबईस एक सभा स्थापन झाली आहे. या सभेचें असें मत झालें आहे कीं, रत्नागिरी जिल्ह्यांतील शेतकरी फार हालाखीत आले आहेत; आणि याचें कारण त्यांना दुःसह कर्ज झालें आहे. या साठीं दक्षिणेंतील शेतकऱ्याचा कायदा या जिल्ह्यांत लागूं करावा. या सभेनें आपल्या पका तीन वजनदार गृहस्थांचें एक स्पेशल कमिशन पाठवून व गांवोगाव ह्यांडबिलें वांटून आपल्या उद्देशाची सर्व जिल्हाभर प्रसिद्धी केली व सुमारें २७०० लोकांच्या सह्या मिळवून आतां या बाबतींत सरकाराकडे आपली दाद लावण्याबद्दल बांबे प्रेसिडेन्सी असोसिएशनला विनंति केली आहे. शेतकऱ्यांचा कायदा इकडे लागूं केला असतां शेतकरी लोक कर्जांतून मुक्त होतील अशी यांची कल्पना आहे. परंतु हा कायदा ज्या चार जिल्ह्यांत हल्लीं चालू आहे त्यांत याचा परिणाम काय झाला आहे याबद्दल या सभेनें कांहीं विचार केला आहे काय? इकडे तर चांगल्या चांगल्या लोकांचे अनुभवावरून असें मत झालें आहे कीं, या कायद्याच्या योगानें शेतकऱ्यांचें हितापेक्षां अहितच फार झालें आहे आणि होत आहे. असें असून ही आमची मुंबईकर मंडळी रत्नागिरी जिल्ह्याकरितां तो कायदा मागत आहे याचें नवल वाटतें.

चीन देशांतील वस्तीच्या मानानें पाहिलें तर तेथें खाण्याचे पदार्थ फारच थोडे आहेत. आणि त्यांची अन्नही त्यांस थोडेंच मिळतें. ते लोक कुत्र्यामांजरांचेंच मांस खाऊन रहात नाहींत, तर घुशी, उंदीर, घुशी, बेडकुळ्या, पाली, टोळ, साप, वागुळेंसुद्धां खुशाल खातात. एखाद्यानें पेटी झाडल्यास त्यांचा मुळें आंतून पडलेली झुरळ, बेदाण्याच्या सारखीं पटापट उचलून तोंडांत टाकून गट्ट करतात!

इंग्लिश जर आपली हद्द ओलांडून आलीकडे येतील तर त्यांस हरकत करावयाची या उद्देशानें तिबेट सरकारानें आपल्या फौजेची जय्यत तयारी चालविली आहे.

क० त०

निजामच्या हद्दींतील सबजजांना जस्टिस आफ धी पिसचा अधिकार देण्याबद्दल त्या सरकारानें हिंदुस्थान सरकारला विचारलें आहे. काय ही आमच्या राजांची परतंत्रता!

गाईनें अधीक दूध द्यावें, म्हणून तिचे हाल केल्याबद्दल कलकत्ता येथील चीफ प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेट यांनीं एका गाई पाळणाराला १०० रुपये दंड किंवा सहा आठवड्यांची कैद, या प्रमाणें शिक्षा दिली. या प्रमाणेंच गैरवर्तन करणारांवर आमच्या म्याजिस्ट्रेट साहेबांनीं पाहून ही अशीच कडक नजर राहील. तर ते सत्कर्तव्य उत्तमच तऱ्हेनें बजावितात, असें आम्ही समजूं.

हिंदुस्थानांतील गहूं मलीन असल्यामुळें त्यांच्यानें अमेरिकन गव्हां बरोबर टक्कर मारत नाहीं. व त्यामुळें हिंदुस्थानांतील गहूं युरोपांत कमी खपूं लागला आहे व जिकडे तिकडे अमेरिकन गव्हास तेजी आली आहे. याबद्दल बंगाल आणि वायव्य प्रांतांतील शेतकी खात्याचे एकीमुख्य अधिकाऱ्यानें गहूं विकविणाऱ्या लोकांस जबाबदार धरलें आहे. परंतु याबद्दलचे सर्व जोखीम देशी व्यापारी व युरोपियन व्यापारी यांवर टाकित आहे. अशी लबाडी न व्हावी म्हणून सदरहू अधिकाऱ्यानें हिंदुस्थानीं गव्हांचा खप अधिक व्हावा अशा इच्छेनें, व्यापारी लोकांस ठरावा बाहेर गव्हांत अधिक कचरा मिश्रण केल्यास जबर दंड करण्यांत यईल असा हुकूम फर्माविला आहे. आतां तरी हे व्यापारी लोक शुद्धीवर येवोत.

भयंकर पूर— होआंगहो नदीस नुकताच एक भयंकर पूर येऊन सर्व लोकांचीं घरें दारें वाहून गेलीं! त्यामुळें असंख्य मनुष्य अन्नान होऊन मोठ्या संकटांत पडलीं आहेत. वाहून गेलेल्या लोकांची संख्या सुमारें १६ पासून २० लक्ष पर्यंत आहे. शिवाय विनवा उत्तरेकडील कांहीं भाग पाण्यानें अच्छादिलेला आहे. व तो पुढें या जलदेवते पासून मुक्त होण्याची आशा हो नाहीं. सर्व लोक आनंदांत असतां त्यांजवर एकाएकी असें भयंकर अरिष्ट कोसळणें हा ईश्वरी क्षोभच म्हणावयाचा.

सरकारचा असा ठराव बाहेर आला आहे कीं, सरकारी नोकराचा अर्धा पगार कर्जाचे करितां नेहमीं जप्त होत असेल, अगर दोन वर्षांहून जास्त जप्तींत असेल, अथवा ज्या कर्जा करितां तो जप्त असेल त्याची फेड होण्यास दोहों पेक्षां जास्त वर्षें लागतील असा सुमार दिसेल, तर ऋणको ज्या आफिसांत नोकरीस असेल, त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानें अशा कर्जाचें पूर्ण शेड्यूल (लिस्ट) मिळवावें व तें सरकाराकडे पाठवून द्यावें म्हणजे सरकार इन्साल्व्हेंट कोर्टा प्रमाणें त्या ऋणकोस सर्व फायदे मिळवून येईल व निकाल करील. अशा रिपोर्टांत मुख्य गोष्टी असल्या पाहिजेत त्या येणें प्रमाणें :— (१) कर्जाचे पगाराशीं प्रमाण व सरकारी नोकर या नात्यानें त्या नोकराची त्यामुळें कमी होत असलेली योग्यता. (२) ऋणकोची स्थिति अनिवार्य दिसते कीं काय व (३) त्यास (अ) ज्या जागेवर तो असेल तिजवर (ब) अगर दुसरे कोणते जागेवर नोकरीवर ठेवणें योग्य आहे कीं नाहीं.

निजाम सरकार व सालरजंग यांचें पुनः जमूं लागलें आहे. असें एक विलायती पत्रकर्ता म्हणतो.

डाक्टर उइलसन साहेबांनीं असा शोध लावला आहे कीं मनुष्याचे डोक्याचे एक चौरस इंच जागेंत ७४४ केसांचे खुंट असतात व त्या प्रत्येकास दोनदोन केस फुटलेले असतात मिळून तेवढ्या जागेंत १०६६ केस असतात सरासरीनें डोक्याचा भाग १२० चौरस इंच असतो. तेव्हां प्रत्येक मानवी प्राण्यांचे डोक्यावर १३३९२० केस असतात.

आसाम प्रांतांतील लागवड करणारे गोरकायांच्या नोकरीस जे मजूर लोक नेतात त्यांना कसा गुलधापी देण्यांत येतात व कितो निष्ठुरपणें वागविण्यांत येते यांच्या हकीकती बंगालच्या पत्रांत वांचून अंगावर रोमांच उभे रहातात. आसाम प्रांतांत चाललेला जुलूम उघड रीतीनें गुलामांच्या व्यापारा पेक्षांही वाईट असें म्हणावें लागतें. बंगालच्या पत्रांना या विषयाचा सारखा विचार पुरविला आहे. व सरकारचे डोळे उघडण्यास अजून हा निश्चय आम्ही धरला आहे.

डाकेच्या गाडीचा वेग वाढविणार— अलाहाबाद ता० १ मार्च— हल्लीं सरकारांत डाकेच्या गाडीचा वेग वाढविण्याविषयींचा विचार चालला आहे. मुंबई व कलकत्ता यांचे मध्यें जाणाऱ्या व येणाऱ्या डाकेच्या गाड्यांचे वेग हल्लींपेक्षां जास्त वाढवावे असें सरकारच्या मनांत आहे व ह्या सरकारच्या विचारास कलकत्त्याच्या चेंबर आफ कामर्स कडून ही आपलें मत देण्यांत आलें आहे ह्या वरून लवकरच ही डाकगाडी जास्त वेगवान होईल असें दिसतें. न्या० सिं०

निजामचें कर्ज— हैद्राबाद संस्थानास किती कर्ज आहे; याची चौकशी करण्या साठीं निजामांनीं मेमरल्दा कमिशनाकडे सावकारांनीं १० कोटींच्यावर कर्जाच्या याद्या दिल्या आहेत. अशा कर्जाचा बुजबुजाट असणाऱ्या निजामांनीं आपलें मित्रत्व व राजनिष्ठा गाजविण्यासाठीं सरहद्द बळकट करण्या करितां ६० लक्ष रुपये देऊ केले. ते वरच्या दातृत्वानें दिले कीं आग्रहपूर्वानें दिले याचा जनसमुहानें विचार करावा.

लवण पर्वत— पंजाबांत झेलम, सांभर आणि बनु जिल्ह्यांत मिठाचा मोठा पर्वत आहे त्या पर्वतांत मीठ काढण्याची एक खाण आहे तीस "मयाखाण" म्हणतात. या खाणींतून मीठ सुरुंग लावून फोडून काढतात. या खाणीपासून लहान लहान आगगाडीचे फाटे नेले आहेत. या खाणींतून दरसाल ४० लक्ष रुपये किंमतीचें मीठ सरकार काढतें असें कळतें.

उद्योग— मिसरदेशांत हातीनें अंडीं उबवून पिलीं काढण्याचा मोठाच उद्योग उन्हाळ्यांतील ३ महिने चालतो. असें अंडीं उबवण्याचे ७०० अड्डे मिसर देशांत आहेत. दरसाल सुमारें १॥ कोट पिलीं या रीतीनें उपजवितात. १ पिलूं निघालें म्हणजे मेहनतीबद्दल दोन अंडीं घेण्याचा रिवाज तेथें आहे.

हायकोर्टाचा उपयुक्त निवाडा पुण्यास एका मनुष्यानें २०८९ आगाऊ देऊन कोष्ट्यांचे काम करणारा एक मनुष्य नोकरीस ठेविला, परंतु यजमान आणखीं पैसा देइना म्हणून या नौकरानें मुळींच काम करीत नाहीं असें सांगून करार तोडला. मि० प्लंकेट माजि० यांनीं हुकूम केला कीं, सदरहू मनुष्यानें २०८९ फिटेपर्यंत कराराप्रमाणें नौकरी करावी किंवा तसें न केल्यास १ महिन्याच्या सक्त मजूरीची शिक्षा भोगावी. हा हुकूम हायकोर्टानें फिरविला. आणि असें ठरविलें कीं आरोपीनें घेतलेल्या पैशाबद्दल कराराप्रमाणें त्यानें स्वतः नौकरी करावी किंवा तिसऱ्या कडून करवावी एवढाच हुकूम करणें कायदेशीर होईल. ह्या कामांत कैदेची दिलेली शिक्षा गैर कायदा आहे. शु० गू०

वानराचें शहाणपण— (उत्तर प्रांताकडील भागचा एक बातमीदार कळवितो) दोन दिवसांपूर्वीं आम्ही कांहीं मंडळी फिरत फिरत जंगलांत गेलों, तों थोडे दूर अंतरावर एक वानर इकडून तिकडे फिरे न कांहीं रागानें ओरडून कोणाचें अंगावर धावतो आहे असें वाटल्या वरून आम्ही सर्व मंडळी तिकडे गेलों, तों एक बराच मोटा सर्प आमचे दृष्टीस पडला. नंतर आम्ही तेथेंच मजा पहात दूर उभे राहिलों, तों इतक्यांत तो सर्प एका मोठ्या दगडावर चढावयास लागला तों पलीकडून त्या वानरानें तो दगड इतक्या त्वेषानें ढकलून दिला कीं, त्या बरोबर त्या सापाचें तोंड ठेंचून लागलाच मृत्यु मार्ग क्रमण्यास लागला व वानर तेथून पळाला.

निजाम सरकारच्या राज्यांत सहाशें मैल रेलवे लाइन सुरू करण्याचें घाटत आहे.

जंगली क्रूर व विषारी जनावरांस मारणारांस आमचे सरकार इनाम देत असतें. तें काढून टाकण्याचा विचार आमचे दयाळू सरकार करीत आहे! त्यासाठीं जिल्हाधिहाय अधिकाऱ्यांस सूचना झाल्याचे समजतें. एक तर आमच्या लोकांस हत्यारें न देण्याचा बंदोबस्त सक्त. व त्यांत हा ठराव! वा! शाबास आमच्या सरकारची. व सुदैव हिंस्त्र व विषारी प्राण्यांचें! त्यानें आतां खुशाल आमच्या लोकांचे बळी घ्यावें.

विलक्षण ठकपणा— आमदाबादच्या कोर्टांत दोन विलक्षण खटले आले आहेत. एकानें रुपये आसिडमध्यें टाकून त्याचा अंश जमवून चांदी उकळण्याचा सपाटा चालविला होता, त्या बद्दल एक खटला आहे. आणि दुसऱ्या खोट्या पोष्टाच्या कार्डां करण्या बद्दलचा आहे. ते० नि०

सरहद्दीवर गडबड चालली आहे म्हणून आमच्यावर इन्कमटाक्स बसविण्यांत आला खर्च जमेपेक्षा जास्त होतो म्हणून मिठावरील जकात वाढविण्यांत आली सरहद्दीचे संरक्षण व्हावें म्हणून आमचे राजरजवाडे आपल्या धैल्या सरकारापुढें ओतीत आहेत काश्मीरच्या राजानें माझ्या शक्तीप्रमाणें फौज फाटा वगैरेंची जी आपणास मदत करवेल ती मी करीन असें सरकारास कळविलें आहे. सरहद्दीवर आतां मुळींच भय नाहीं. मातीच्या भिंती घालून सरहद्द कायम केली वगैरे बातमी अनिबद्धन आम्हांस मिळतच आहेत मग याचा व वरच्या देणगीचा ताळा कसा पडतो? सरहद्दीवर भय असल्या वांचून जो तो राजा उगीच आपल्या थैल्या सोडील? कांहीं तरी गुप्त जळू आमच्या या राजांस लागली असावी असा लोकांचा तर्क आहे.

निझामानें आपल्या नबाब फकरुद्दौलाजंग यांस आणखी २०० रुपये पगार वाढविला. म्हणजे पूर्वीं यांस १८०० शें पगार होता तो २००० करण्यांत आला हे गृहस्थ सुमारें पांच वर्षांपूर्वीं प्रथम चाकरीवर लागले त्यावेळीं त्यांस ४०० रुपये पगार होता याचा उदय इतक्या थोड्या काळांत इतका चांगला झाला म्हणून कित्येक इंग्रजी पत्रें संशय धरीत आहेत परंतु यांनीं जर इंग्रज कारकिर्दीकडे थोडेंसें लक्ष्य दिलें तर इकडे २० रुपयाचे एकदम १०० रुपये झाल्याची पुष्कळ उदाहरणें सांपडतील मग त्याची ओरड फुकट नव्हे काय?! ठा० अ

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.